मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

दर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

सप्टेंबर

१९६४

★

ल्य ५० न. पैसे

या अंकात

* प्रा. गो. मा. कुलकर्णी
* श्री. व. स. येरकुंटवार
* प्रा. श्री. मा. कुलकर्णी
* प्रा. हि. ए. चव्हाण
* राजा महाजन
* प्रा. ब. ग. खापर्डे
* या. मु. पाठक
* कृष्णा चौधरी
* प्रा. श्री. भा. वर्णेकर

शिवाय, संपादकीय

परिचय परामर्श, संघवार्ता इ०

संपादकः– प्रा. श्री. मा. कुलकर्णी

अनुक्रमणिका

:: संपादक मंडळ ::
भा. श्री. परांजपे
व. कृ. वऱ्हाडपांडे

युगवाणी

संपादक:—श्री. मा. कुलकर्णी

वर्ष १९] सप्टेंबर १९६४ [अंक ५

संपादकीय

देवा तूंचि गणेशु

आद्य, वेदप्रतिपाद्य व स्वसंवेद्य अशा आत्मरूपी परमेश्वराला नमन केल्या-नंतर ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या आरंभी त्याच परमेश्वराला 'गणेश' म्हणून संबोधले आहे व त्याचे रूपकात्मक वर्णन केले आहे. गणेशाला सुरूवातीसच 'सकलार्थ—मतिप्रकाशु' असे एक विशेषण ज्ञानेश्वरांनी लागले आहे. सर्वांच्या मतीत यथार्थ ज्ञानाचा प्रकाश असणारा, सर्वांच्या मतीत यथार्थ ज्ञानाने स्फुरणारा असे म्हणून गणेशाचे अत्यंत समर्पक वर्णन ज्ञानेश्वरांनी केले आहे. वैदिक वाङ्मयात गणेश ही ज्ञानदात्री देवता मानली जाते. अर्थात् मतिप्रकाश करण्याची शक्ति ही मूळची परमेश्वराचीच असून तीच गणेश या नामरूपाने प्रगट झाली आहे.

हे संपूर्ण शब्दब्रह्म, म्हणजेच संपूर्ण वाङ्मय, हीच त्या गणेशाची मूर्ति आहे. स्मृति हे अवयव, अठरा पुराणे ही रत्नभूषणे, काव्यनाटके म्हणजेच क्षुद्रघंटिका, षड्दर्शने हीच सहाभुजा; आत्मानात्मविवेक हाच सरळ शुंडादंड, दान मीमांसा म्हणजे दोन कान आणि उपनिषदे हीच मुगुटावरील फुले; असे हे भव्य रूपक आहे. संपूर्ण वाङ्मयात काव्य—नाटकादि ललित साहित्याचं स्थान व महत्व काय व किती हे यावरून चांगले घ्यानात येते.

प्राचीन कवि ग्रंथारंभी सरस्वतीच्याहि अगोदर गणेशाला वंदन करीत असत. कारण त्यांना वाणीचे विलास, चातुर्य, कलात्मकता, आकर्षकता यांच्या बरोबरच यथार्थ ज्ञानाची अपेक्षा असे, विवेक हवा असे. शंभर वर्षापूर्वीच्या मराठी रंगभूमीवर देखील सरस्वतीच्या अगोदर गणपतीचा प्रवेश होऊन जात असे.

आधुनिक कवि काव्यदेवता म्हणून शारदेची स्तोत्रे गात असत. आणि आता 'नवकवि' गणेश—शारदाच काय, कोणालाहि नमन करीत नाहीत. त्या मुळेच की काय, नवकविता यथार्थ ज्ञानाला व कलापूर्ण अभिव्यक्तीलाहि मुकत चालली आहे

अनुक्रमणिका

"काव्य लिहिले मी खरे, परी मातें
शारदेने जो मंत्र दिला कानी,
तसें लिहिलें मी,—काव्य तिचें मानीं !"

असे म्हणणाऱ्या केशवसुतांना कवितेच्या अभिव्यक्तीत ठाकठीकपणा अपेक्षित होता. त्यांनी १९०५ साली एका होतकरू कवीला जो उपदेश केला होता तो आजहि नवोदित वा भावी कवींनी लक्षात घेण्यासारखा आहे. केशवसुतांनी लिहिले आहे,

"......पद्यलेखन प्रसिद्धीस आणावयाचें तर जपून शुद्ध लिहिलें पाहिजे. त्यांत ऱ्हस्वदीर्घाची ओढाताण होईल तितकी करून टाळलेली पाहिजे. व्याकरणाचे नियम पूर्णपणें पाळलेले पाहिजेत. भाषासंप्रदाय आणि छंद:शास्त्राचे नियम यांची हेळसांड केलेली असणें उपयोगाचें नाही. ज्यांत वृत्तनियम पाळले आहेत, ज्यांत व्याकरणाची चूक नाही, शब्दांचीं रूपें शुद्ध आहेत अशी पत्रें असतील तर तीं वाचण्यास लोक हाती तरी धरतील. मग त्यात शब्दसौष्ठव किती आहे किंवा रसपरिपाक कसा उतरला आहे हा पुढला विचार."

"हल्ली महाराष्ट्रांत ज्यांना गद्याच्या चार ओळीहि जपून लिहिता येत नाहीत असे वृत्तदर्पण्ये कवि पैशापासरी झाले आहेत. अशात आपली गणना करून घेऊ नका. वाणी ही फार मोठी देवता आहे. सामान्य देवतांच्या आराधनासुद्धा फार जपावे लागते. मग या देवतेच्या आराधनास किती जपावे लागेल बरे !"

—'समग्र केशवसुत', सं. भ. श्री. पंडित, पृ. ३९३–९४.

वाग्देवतेचेच आराधन जिथे थांबले आहे तिथे 'विवेकशुंडाघरू' 'उन्मेष-सूक्ष्मेक्षणु' व 'सकलार्थमतिप्रकाशु' अशा गणेशाची उपासना दूरच. वाग्देवतेची व बुद्धीच्या देवतेची उपासना करण्याची सद्बुद्धि महाराष्ट्रातील नवोदित कवींना व लेखकांना होवो अशी त्या बुद्धिदात्या गणेशाजवळ आमची प्रार्थना आहे.

'युगवाणी'चा दिवाळी अंक

यानंतरचा युगवाणीचा अंक ऑक्टोबर अखेर दिवाळी अंक म्हणून प्रसिद्ध होईल. त्याची पृष्ठसंख्या सुमारे ८० राहील व त्यात कथा, कविता, टीका इ. साहित्याचा समावेश होईल. कांही नामांकित साहित्यिकांनी साहित्य देण्याचे मान्य केले आहे. १ ऑक्टोबर पर्यंत आमच्याकडे येणाऱ्या अनाहूत साहित्यातील निवडक साहित्यहि या अंकात दिले जाईल.

—श्री. मा. कुलकर्णी

गणेश चतुर्थी
दि९ सप्टेंबर, १९६४

अनुक्रमणिका

परत मातृभूमीला

ले. प्रा. गो. मा. कुलकर्णी

इथाका हे न्यू यॉर्क राज्यातलं एक लहानसं शहर आहे. त्याची प्रसिद्धि तिथे असलेल्या कॉर्नेल युनिव्हर्सिटीमुळे आहे. कॉर्नेल युनिव्हर्सिटीहि अमेरिकेतील प्रसिद्ध विद्यापीठांपैकी एक आहे. अमेरिकेतील सर्व विद्यापीठात कॉर्नेलचं कॅम्पस् मोठं आहे. त्याचं क्षेत्रफळ ९५०० एकर आहे. हे विद्यापीठ पाहण्याचा माझा विचार बऱ्याच दिवसांपासून होता. तिथे माझ्या बरोबरच आलेले केरळातील श्री. व सौ. सोन्स होते. त्यांची इच्छाहि मी तिथे यावं अशी होती. फिलाडेल्फियात इथाकाला जाण्याच्या मार्गाची चौकशी केली. तर बऱ्याच जणांना इथाका कुठे आहे ते माहीत नव्हतं असं आढळून आलं. कॉर्नेल् युनिव्हर्सिटीचं तर त्यांनी नांवहि ऐकलं नव्हतं. शेवटी बस डेपोमधे जाऊन चौकशी केली व तिकिट घेऊन आलो. दुपारी पावणे दोनच्या बसनं निघालो व वाटेत एका ठिकाणी बस बदलून पावणे नऊ वाजता इथाकाला पोंचलो. ठरल्यापेक्षा एक दिवस आधी मी तिथे पोंचलो होतो. त्यामुळे सोन्स बस स्टेशनवर येण्याचा प्रश्नच नव्हता. फिलाडेल्फियाहून मी त्यांना 'ट्रंककॉल' केला होता पण ते घरी नव्हते. बस स्टेशनवरून मी त्यांना फोन केला. फोन कुणीहि उचलला नाही. आणखी पंधरा मिनिटांनी फोन केला. तेव्हां श्री. सोन्सनी तो घेतला. मी आल्याचं कळताच त्यांना फार आनंद झाला. लगेच टॅक्सी करून मी त्यांच्या घरी गेलो. त्यावेळी ९। वाजले होते तरी नुकतीच दिवेलागणी झाली होती. उन्हाळ्याच्या दिवसात सूर्यास्त साडेआठ पावणेनऊला होत असतो. श्री. व सौ. सोन्स यांनी माझं चांगलं स्वागत केलं. मी भेटल्याचा त्यांना खरा आनंद झाला. दोन वर्षांपूर्वी आमची शिकागो येथून फाटाफूट झाल्यानंतर मधे पुष्कळ घटना घडून गेल्या होत्या. आम्ही दोघांनीहि डॉक्टरेट मिळविली होती. दोघांनाहि निरनिराळ्या प्रकारचे अनुभव आले होते. बोलायचं इतकं होतं की मध्यरात्र उलटली तरी गप्पा संपल्या नाहीत. दोन दिवसांच्या माझ्या तेथील वास्तव्यात आम्ही भरपूर बोलून घेतलं. पुष्कळ बाबतीत त्यांचे व माझे अनुभव व त्यावरून बनलेले विचार सारखेच वाटले.

कॉर्नेल् युनिव्हर्सिटी म्हणजे अवाढव्य काम आहे. इथाका शहराच्या बाहेर टेकडीवर हजारो एकरांचं कॅंपस् पसरलं आहे. टेकड्या, दऱ्याखोरे, नद्यानाले, जंगल व झाडी वगैरे मुळे परिसर अतिशय निसर्गरम्य आहे.

अनुक्रमणिका

अध्ययन–अध्यापनाला आदर्श अशी जागा आहे. कोणत्याहि अमेरिकन विद्यापीठात राहतील अशा सर्व सोयी इथे आहेत. दोन दिवस हिंडूनहि अतिशय थोडा भाग मी पाहू शकलो. कोणतीहि अमेरिकन शिक्षणसंस्था पाहात असताना प्रामुख्याने नजरेत भरणारी गोष्ट म्हणजे वाचनालय. अतिशय समृद्ध वाचनालये आहेत. लक्षावधि ग्रंथ व शेकडो नियतकालिकं विद्यार्थ्यांना आवाहन करीत असतात. अमुक एका विषयावर वाचन–लेखन करायचं आहे पण साहित्यच नाही असं तिथे कधी होत नाही. वाचनालयाचं हे महत्त्व आपल्याला अद्याप कळलं नाही. आधीच शिक्षणावर आपण पैसा फार कमी खर्च करतो. त्यातूनहि ग्रंथालयावर फारच कमी. ज्ञानाची साधनंच आपण उपलब्ध करून देत नाही, मग ज्ञान कुठलं ?

दोन दिवस सोन्स पतिपत्नींचा पाहुणचार घेऊन २१ जून रोजी सकाळी ९ वा. बसनं इथाका सोडलं व दुपारी साडेतीन वाजता न्यू यॉर्कला पोंचलो. हे माझं तिसऱ्यांदा न्यू यॉर्कला आगमन. हा अमेरिकेतला माझा आता शेवटचा टप्पा होता. दोन दिवसांनी मी इथून मायदेशाच्या वाटेवर लंडनकडे उड्डाण करणार होतो.

न्यू यॉर्कच्या बस स्टेशनवर उतरलो. वाय्. एम्. सी. ए. मधे जायचं होतं. पण टॅक्सीच लवकर मिळेना. न्यू यॉर्कला मला नेहमीच असा अनुभव आला. टॅक्सीसाठी फार वेळ वाट पाहावी लागते. शेवटी कशीतरी एक टॅक्सी मिळाली व विल्यम् स्लोन्स वाय्. एम्. सी. ए. मधे आलो. इथेहि एकपलंगी खोली मी आधीच रिझर्व केली होती. त्यामुळे कांही त्रास झाला नाही. खोलीत सामान टाकून, कपडे बदलून खाली आलो व अमेरिकन एक्सप्रेस कंपनीच्या कचेरीत फोन केला. अद्याप मला विमानाची तिकिटं व युरोपातील हॉटेलात जागा राखून ठेव-ल्याच्या पावत्या अमेरिकन एक्सप्रेस कडून मिळाल्या नव्हत्या. कंपनीच्या कचेरी-तील रिसेप्शनिस्टनं मला साडेपाच वाजे पर्यंत येऊन सर्व साहित्य घेऊन जायला सांगितलं. त्यावेळी साडेचार वाजले होते. बस ड्रायव्हरच्याच सहाय्यानं मी अमेरिकन एक्सप्रेसच्या कचेरीत पांच वाजता पोंचलो. तेथील संबंधित कर्मचाऱ्यानं माझा पासपोर्ट पाहिला व विमानाच्या तिकिटांचं एक पुस्तक, हॉटेलातील रिझर्वे-शनच्या पावत्यांचं एक पुस्तक, आणि कंपनीच्या ठिकठिकाणच्या पत्त्यांचं पुस्तक अशी तीन पुस्तकं दिली. आणि कांही उपयुक्त सूचना केल्या. मुख्य म्हणजे प्रत्येक ठिकाणी आदल्या दिवशी संबंधित विमान कंपनीला आपण ठरल्या प्रमाणे प्रवास करणार आहोत असं कळवायला सांगितलं. ही सर्वमान्य पद्धतच आहे. त्याला कन्फर्मेशन ऑफ रिझर्वेशन म्हणतात. त्यामुळे विमानकंपनीच्या लोकांना आगाऊ रिझर्वेशन केलेल्या पैकी नक्की कोण कोण जाताहेत हे कळतं. रिझर्वेशन यावेळी बदलूनहि घेतां येतं. विमानाच्या प्रवासात या सोयी फार असतात

अनुक्रमणिका

एखाद्या कंपनीचं विमान उशीरा निघणार असलं व प्रवाश्याला मूळ ठरलेल्या वेळी निघणं आवश्यक असलं तर कंपनीचे अधिकारी दुसऱ्या कंपनीचं विमान त्या वेळी निघणार असेल तर त्यात सोय करून देतात. एकंदरीनं विमानाच्या प्रवाश्यांना अद्याप तरी फार सन्मानानं वागविलं जातं.

न्यू यॉर्कला मी पूर्वी दोन वेळा येऊन गेलो होतो. त्या वेळी प्रेक्षणीय स्थळं पाहिली होतीच. या वेळेला विशेष कांही पाहण्याची इच्छा नव्हती, वेळहि नव्हता. फक्त कोलंबिया विद्यापीठ पूर्वी पाहायचं राहून गेलं होतं ते पाहिलं. हे विद्यापीठहि अमेरिकेच्या प्रसिद्ध विद्यापीठां पैकी एक आहे. शहरातच सुमारे एक चौरस मैलाच्या परिसरात विद्यापीठाच्या इमारती पसरल्या आहेत. विद्यापीठ त्या वेळी बंद असल्यामुळे ग्रंथालय व कांही खुला असलेला तेवढा भाग पाहिला. टाइम स्क्वेअर, रॉकेफेलर सेंटर, एम्पायर स्टेट बिल्डिंग, संयुक्त राष्ट्रसंघ इत्यादि परिचित ठिकाणावरून फेरफटका केला. बरेच भारतीय विद्यार्थी व प्रवासी तिथे भेटले. कांही भारताला परत निघाले होते, कांही नुकतेच आले होते, कांही तियेच राहत होते. माझं लक्ष आता त्या कशातहि रमत नव्हतं. मी परत निघालो होतो व केव्हां अेकदा सर्व प्रवास आटोपून मुंबईला उतरतो असं झालं होतं. पुष्कळ वेळा असं वाटायचं की उगीच त्या युरोपच्या प्रवासाच्या फंदात पडलो. सरळ गेलो असतो तर चोवीस तासात मुंबईला पोंचलो असतो. पुष्कळ वेळा मी तेथील माझ्या मित्रांना म्हणालो की लोकमताची भीति नसती तर मी सरळ मुंबईला गेलो असतो. आपण सरळ मुंबईला जायचं आणि तिथे लोकांनी म्हणायचं 'काय वेडे तुम्ही. युरोप पाहण्याची आयती संधि चालून आली असता सरळ निघून आलात. मुंबई का कुठं पळून चालली होती ? आम्हांला अशी संधि मिळाली असती तर चांगला चार महिने युरोपात प्रवास केला असता.' असं बोलून घेण्या पेक्षा तीन आठवडे युरोपात काढलेलं परवडलं म्हणून मी प्रवासाला तयार झालो होतो. खरी अंतरीची इच्छा सरळ मुंबईला जाण्याचीच होती. भारत सरकारनं चार महिन्यासाठी पाठविलेले कांही प्राध्यापक तिथे भेटले. तेहि परत निघाले होते. त्यांना सरळ प्रवास करण्याचा हुकूम होता. ते चोवीस तासात मुंबईला पोचणार होते. मी त्यांना म्हणालो. "तुम्ही किती सुदैवी." ते उलट म्हणाले, "तुम्ही खरे सुदैवी." प्रत्येकजण दुसऱ्याला सुदैवी समजतो हे मात्र खरं.

२२ जूनची रात्र ही माझी अमेरिकेतली शेवटची रात्र व २३ जूनचा दिवस हा शेवटचा दिवस. त्या रात्री दोन वर्षांतल्या सर्व बऱ्यावाईट गोष्टींची मनात उजळणी केली. सुदैवानं चांगल्या गोष्टींचीच जमा अधिक होती. जास्तींत-जास्त आकर्षण म्हणजे सेंटलुईच्या वॉशिंग्टन विद्यापीठाचं. माणूस जिथे विद्यार्जन करतो त्या ठिकाणाला तो लवकर विसरू शकत नाही. त्या संस्थेविषयीचा

अनुक्रमणिका

आदर, प्रेम व आपुलकी त्याच्या मनात नेहमी असते. म्हणूनच परदेशी विद्यार्थ्यांना आपल्या देशात शिक्षणाच्या सोयी करून द्यायच्या. वॉशिंग्टन विद्यापीठात माझा दोन वर्षांचा काळ अतिशय आपुलकीच्या वातावरणात गेला. थेट चॅन्सेलर प्रो. टॉमम एच्. एलिएट पासून तो ग्रंथालयात काम करणाऱ्या साध्या क्लर्क पर्यंत सर्वजण माझ्याशी अतिशय आपुलकीनं वागत असत. प्राध्यापक वर्ग, विशेषतः माझे मार्गदर्शक डॉ. कार्ल ए. मॅकँडलेस, माझ्याशी फारच सौहार्दानं वागत असे. त्या समृद्ध ग्रंथालयाची आठवण झाली की अजूनहि तिथे जाऊन वाचन करावं असं वाटतं. त्या वाचनालयाचा, त्या विद्यापीठाचा, व तेथील प्राध्यापकांचा निरोप घेणं हेच सर्वात अवघड काम होतं. त्या सर्वांच्या आठवणी त्या रात्री आल्या. म्हणून आवश्यकते पेक्षा एक दिवसहि अधिक मी अमेरिकेत राहायला तयार नसूनहि त्या शेवटच्या दिवशी अमेरिकेचा निरोप घेताना मन जड झालं. प्रथम न्यूयॉर्क बंदरात उतरलो त्या वेळी आम्ही दहा डॅन्फोर्थ इंडियन फेलोज् होतो. उतरवून घ्यायला आदल्या वर्षीचा फेलो व डेरियनच्या नागरिकातर्फे एक महिला, आले होते. परत निघतांना मात्र मी अेकटा होतो. मला निरोप देणारे एक हजार मैल मागे सेंट लुईला होते व मला उतरवून घेणारे दहा हजार मैल पुढे नागपूरला होते. मी एकटा येवढा मोठा प्रवास करण्याची मानसिक व व्यावहारिक तयारी करीत न्यू यॉर्कच्या वाय्. एम्. सी. ए. मधील खोलीत बसलो होतो.

२३ जूनचा दिवस कांहीसा मनस्तापाचा गेला. २२ जून रोजी सकाळी ब्रेकफास्ट आटोपून मी कोलंबिया विद्यापीठाकडे जाण्यासाठी बाहेर पडत होतो तेवढयात मागून एकानं 'Are you from Pakistan?' असं मला उद्देशून म्हटलं. मी मागे वळून म्हटलं, 'No, from India.' एक चाळिशीच्या सुमाराचा, ठेंगणासा, कांहीसा ढेरपोटचा गृहस्थ माझ्याकडे येत होता. त्यानं आपण भारत व पाकिस्तानचा दोन–तीन वेळा दौरा केल्याचं सांगितलं व आता पुढच्याच आठवडयात पुन्हा जाणार आहे असं म्हणाला. माझ्या बरोबर तो बाहेर आला व बोलता बोलता मी कुण्या खोलीत उतरलो आहे व कोणत्या विमानानं जाणार आहे ते त्यानं काढून घेतलं. थोडया वेळानं 'मी तुम्हांला संध्याकाळी जेवायला घेऊन जातो' म्हणाला. मी आभार मानून वेळ नाही म्हणून सांगितलं. त्यावर तो व मी आपापल्या रस्त्यांनी गेलो. रात्री दहाच्या सुमाराला मी परत येऊन काउंटरवर खोलीची किल्ली मागितली. किल्ली बरोबर कर्मचाऱ्यानं एक चिट्ठीहि दिली. त्या चिट्ठीत सकाळच्या त्या गृहस्थानं 'उद्या आपण ब्रेकफास्ट एकत्र घेऊ' असं लिहिलं होतं. दुसरे दिवशी म्हणजे २३ जूनला सकाळी साडेआठ वाजता मी आंघोळ करून कपडे करीत होतो

तेवढ्यात दारावर टकटक झालं. दार उघडून पाहतो तो तो गृहस्थ उभा. तो व मी बरोबरच खाली गेलो. तिथल्याच कॅफेटेरियात ब्रेकफास्ट घेतला. ब्रेकफास्टच्या वेळी त्या गृहस्थानं सांगितलं की तो त्याच रात्री मी जाणार त्याच एअर–इंडियाच्या विमानाच्या फ्लाइट नं. १०८ नं लंडनला जाणार होता. त्यानं वेळ व फ्लाइट नं. बरोबर काढून आणली होती. मी त्याच्या प्रयाणाचं कारण विचारलं तर आपल्या पुतणीच्या लग्नासाठी जाणार आहे म्हणाला. लंडनला कुठे उतरणार आहेस म्हणून विचारलं तर पिकॅडेली सर्कसमधे रीजंट पॅलेस हॉटेलात उतरणार असल्याचं सांगितलं. तुझं नाव पत्ता दे म्हटल्यावर ब्लॉक लेटर्समधे RALPH C. WILLIAMS REGENT PALACE असं एका कागदावर त्यानं लिहून दिलं. तो कागद अजूनहि माझ्या जवळ आहे. त्यानं ब्लॉक लेटर्समधे कां लिहावं याचं थोडं आश्चर्य त्या वेळीहि मला वाटलं. मला म्हणाला, 'माझ्या पुतणीला फर्निचर भेट द्यायचं आहे. ते जवळच्या हाटेलात आहे. ते तेवढं पॅक करायचं आहे. 'ब्रेकफास्ट आटोपल्यावर 'तुम्हांला सवड असेल तर तिथपर्यंत आपण जाऊन येऊं.' मला कांही काम नव्हतंच पायहि मोकळे होतील म्हणून मी त्याच्या बरोबर निघालो. वाटेत तो 'आपण बरोबरच एअर टर्मिनलला जाऊं, 'टॅक्सीचं भाडं वाटून घेऊं' असं म्हणाला. मी 'ठीक आहे' म्हणालो. एकदोन मिनिटांनी माझा दंड आपलेपणानं दाबीत तो म्हणाला. 'I was selfish when I said we will divide the taxi fare. I will pay, you don't worry.' मी 'आपण दोघेहि देऊं' असं त्याला म्हणालो, पण मनात माणूस भला दिसतो असं वाटल्यावाचून राहिलं नाही. त्या हॉटेलात पोंचल्यावर त्यानं मला प्रतीक्षागृहात बसायला सांगितलं व 'आता येतो' म्हणून एका भागात तो गेला. दहाबारा मिनिटांनी परत आला व माझ्या शेजारी कोचावर बसून आपल्याशीच चुटपुटायला लागला. मी कांहीच विचारीत नाही असं पाहून आपणच म्हणाला, 'पैशाची थोडी तूट आहे.' मी नुसतं, 'अस्सं' म्हटलं. मग तोच सांगू लागला, 'फर्निचरच्या किंमतीचे पैसे माझ्याजवळ आहेत, पण टॅक्स द्यावा लागेल असं कळलं. ते पैसे तेवढे कमी पडतात. आता परत वाय्. एम्. सी, ए. मधे जाऊन यावं लागेल.' मी कांहीच म्हणालो नाही. आणखी थोडा वेळ चुटपुटून त्यानं विचारलं, 'तुमच्या जवळ कांही डॉलर्स आहेत?' मी त्याची अपेक्षा केलीच होती व कुणालाहि, तेहि अमेरिका सोडायच्या दिवशी, पैसे द्यायचे नाहीत असं ठरवलं होतं. तरी त्याला स्पष्ट नाही म्हणण्याऐवजी 'किती हवेत' म्हणून विचारलं. आता जमतय असं वाटून तो म्हणाला, 'तसं तरी शंभर डॉलर पाहिजेत. पण तुम्ही पन्नास दिले तरी चालेल.' मला आधीच संशय आला होता

आता तर तो फसवू पाहात आहे हे स्पष्टच झालं. मी 'तेवढे नाहीत' म्हणून सांगितलं. 'मग किती आहेत ? मी परत वाय्. एम्. सी. ए. ला जाताच तुम्हाला देतो. असं तो म्हणाला, तो कांही परत देणार नाही. दिलेले पैसे घेऊन गायब होईल हे मी पूर्ण ओळखलं होतं. तरी अमेरिकेत भामटे कसे आहेत, व कसं फसवतात हे प्रत्यक्षच पाहावं म्हणून 'फक्त दहा डॉलर आहेत' असं मी सांगितलं. 'तेवढेच द्या' असं तो म्हणाला तेव्हां तर हा भामटाच आहे याची पूर्ण खात्री झाली. पण घेऊं या तरी हा अनुभव ह्या भावनेनं व आता नाही मी फसलो तर संध्याकाळी हा जास्त कांही तरी धोका करील ह्या कल्पनेनं मी त्याला दहा डॉलर दिले. व तो आता येतो म्हणून जो गेला तो गेलाच. मी अर्धा तास त्याची वाट पाहून परत वाय्. एम्. सी. ए. मधे आलो. त्यानंतर तो तिकडे फिरकलाच नाही. दोनतीन दिवसांनी पुन्हा कुणाला तरी फसवायला गेला असेल. हा त्याचा धंदाच असावा. अमेरिकेत मला असा अनुभव पूर्वी आला नव्हता. ती उणीव राहू नये म्हणून कदाचित् अमेरिका सोडण्याच्या दिवशी हा अनुभव आला. अमेरिकन भामटा पहायला मिळाला हे काय थोडं झालं ? अनेक अमेरिकनांनी 'तुम्हांला अमेरिकन लोक कसे वाटतात ?' असं विचारलं होतं. सुदैवानं मला सर्व चांगले अमेरिकनच भेटले तेव्हां ते वाईट असतात असं कसं म्हणू ?' असं उत्तर मी देत असे. शेवटच्या दिवशी दुसऱ्या प्रकारचा अमेरिकनहि भेटला.

त्याच दिवशी घडलेली दुसरीहि एक घटना सांगण्यासारखी आहे. दुपारी एअर इंडियाच्या लोकांना फोन करून मी ठरल्या प्रमाणे आज प्रवास करणार आहे असं कळवलं. फोन करण्यासाठी दहा सेंटचं नाणं टाकावं लागतं. त्यासाठी मी माझं लहान पाकीट बाहेर काढलं होतं. ते तिथेच मी विसरलो. पुढे दोन–तीन तासांनी पाकिटाची गरज पडली. पाहतो तो पाकीट नाही. थोडा विचार केल्या-नंतर आठवलं की आपण ते टेलिफोन बूथ मधे विसरलो. तिथं पाहिलं तर नव्हतं. पाकिटात फक्त कांही सेंटची चिल्लर होती. पण माझ्या हँडबॅगची किल्ली त्यात होती. त्यासाठी मला चुटपुट लागून राहिली. एकदोन तासांनी मी सहज रिसेप्शनिस्टला पाकीट हरवल्याचं सांगितलं. त्यानं 'लॉस्ट आर्टिकल्स' विभागात चौकशी करायला सांगितलं. तिथं जाऊन 'माझं लहानसं पाकीट मी टेलिफोन बूथ मधे चार तासापूर्वी विसरलो म्हणून सांगत असतानाच त्यानं 'केअढं होतं, रंग कसा होता. झिपर होती का बटन होती, आत काय होतं ?' असे प्रश्न विचारले व मी बरोबर माहिती देताच हंसून म्हणाला, 'Yes, we have received such a purse.' आणि त्यानं एक रजिस्टर काढलं त्यात पाकिटाची व आंतल्या वस्तूंची नोंद होती. रजिस्टरवर माझी सही घेऊन 'Returned to the owner' असा शेरा मारून माझं पाकीट त्यानं मला दिलं.

वरील दोन्ही घटना एकाच ठिकाणी, एकाच दिवशी घडल्या.

माझं लंडनकडे जाणारं विमान रात्री साडेनऊ वाजता निघणार होतं. मी फोन करून माझं जाणं निश्चित आहे असं कंपनीला कळवलं तेव्हां त्यांनी कमीत कमी दोन तास आधी एअर टर्मिनलमध्ये उपस्थित राहायला पाहिजे असं सांगितलं होतं. पुढे असं प्रत्येक ठिकाणीच करावं लागलं. त्याला 'चेकिंग इन्' असं म्हणतात. कंपनीचा माणूस फोनवर सांगतो, 'Please check in before half past seven.' वगैरे. न्यू यॉर्क येथे टॅक्सी मिळण्याला फार त्रास पडतो म्हणून मी सहा वाजताच सडकेवर येऊन उभा राहिलो. पंधरा मिनिटं प्रयत्न केल्यानंतर टॅक्सी मिळाली आणि साडे सहाला 'ईस्ट साइड एअर टर्मिनल' मधे हजर झालो. अतिशय भव्य हॉलमधे दुतर्फा जगातील सर्व विमान कंपन्यांच्या कचेऱ्या होत्या. कितीतरी नांवं मी प्रथमच वाचीत होतो. प्रत्येक काउंटरवर प्रवाश्यांची गर्दी होती. त्यांचं सामान तोलणं चालू होतं. एअर इंडियाची स्वतंत्र कचेरी न्यू यॉर्कला नाही. बी. ओ. ए. सी. (ब्रिटिश ओव्हरसीज् एअर वेज् कार्पोरेशन) च्या कचेरीतच एअर इंडियाचा विभाग आहे. म्हणजे बी.ओ. ए.सी. ची मंडळीच एअर इंडियासाठी काम करतात. बी.ओ.ए.सी. चं काउंटर वरच्या मजल्यावर होतं. फिरत्या जिन्यानं वर गेलो. सुदैवानं तिथं फारशी गर्दी नव्हती. माझं तिकीट काउंटरवरच्या मुलीला दाखवलं. तिनं 'एअर इंडिया फ्लाइट ११६ इज् डिलेड बाय टेन आवर्स' म्हणून सांगितलं व मला धक्का बसला. मग स्मित करीत ती म्हणाली, 'If you wish, I can put you on B.O.A.C. plane which leaves at 10 p. m.' मी थोडा वेळ स्तब्धच उभा राहिलो. ती पुढे म्हणाली, 'That is also non-stop jet'. मला हा प्रथमग्रासे मक्षिकापात वाटला. एअर इंडियाच्या विमानानंच अमेरिका सोडायची असं मी ठरविलं होतं. मी आयुष्यांत प्रथमच विमानांत बसणार होतो. ते एअर इंडियाच्या विमानातच बसावं अशी माझी इच्छा होती. आणि आता तर हा घोटाळा झाला. एअर इंडिया साठी थांबावं तर दहा तास कुठे काढावेत हा एक प्रश्न व पुढच्या सर्व कार्यक्रमाचा गोंधळ होणार हा दुसरा प्रश्न. म्हणून बी.ओ.ए.सी. च्या जेटनं जायचं ठरवलं व काउंटरवरच्या मुलीला तसं सांगितलं तिनं माझ्या सामानाचं वजन केलं, तिकीट बुकातून एक कागद फाडून घेतला, व मला 'बोर्डिंग पास' दिला. विमानात चढताना तो परवाना दाखवावा लागतो. लगेच त्या मुलीनं विमानतळावर फोन करून एक 'सवारी' मिळाल्याचं कळवलं. तिच्या तोंडावर ज्या प्रकारचं हंसू होतं त्यावरून एअर एंडियाची एक 'सवारी' आपण पळवली असा भाव व्यक्त होत आहे असं मला वाटलं, आणि आपल्या विमान कंपनीचे पैसे बुडाले याची

हळहळ वाटली. आपल्या कंपनीची स्वतंत्र कचेरी असावी असाहि विचार मनात येऊन गेला. एअर टर्मिनल वरून विमानतळाशी बोलणाऱ्या मुलीचं टेलीफोन-वरील बोलणं अगदी समोर असूनहि मला ऐकायला आलं नाही. चार-पांच ठिकाणी हाच अनुभव आला. एखाद दुसरा शब्द कानावर पडला तरी स्पष्ट कळायचा नाही. गिऱ्हाइका समोर त्याला न कळू देता बोलण्याची हतोटी त्या मुलींनी कशी साध्य केली असेल याचं मला कौतुक वाटायचं. त्यांचं ते ओठातल्या ओठात बोलणं ऐकायला, नव्हे पाहायला, मौज वाटायची.

माझी बॅग बी.ओ.ए.सी. च्या मुलीनं आपल्या ताब्यात घेतल्यामुळे मी मोकळा झालो. तरी एक हँडबॅग व ओव्हरकोट यांचं ओझं सावरणं भागच होतं. त्या एअर टर्मिनलवर प्रवाशांच्या सोयीची सर्व साधनं होती. लोकांची सारखी ये–जा चालू होती. दर पांच–दहा मिनिटांनी 'अमुक ठिकाणी जाणाऱ्या प्रवा-श्यांनी, अमुक गेट जवळ उभ्या असलेल्या बसमधे बसावं' अशा सूचना लाउड स्पीकरवर येत होत्या. तिथे विमा कचेरीहि होती. प्रवासाचा विमा काढायचा नाही असं मी ठरवलं होतं. आपण बसू त्या विमानाला कांही होणार नाही अशी माझी भावना होती. होता होता ८–३५ ला आमच्या बसचा पुकारा झाला. चाळीस जणांच्या भल्या मोठ्या बसमध्ये आम्ही जेमतेम आठ-दहा जण होतो. बस आयडल्‌वाइल्ड विमानतळावर पोंचली तेव्हां सूर्यप्रकाशा सारखा दिव्यांचा झगझगाट तिथे दिसला. दर मिनिटाला एक विमान तिथून सुटतं. त्या गर्दीत आपण कुठं जायचं, कोणत्या गेटनं जायचं, केव्हां जायचं, कांही कळत नाही. अनाउन्समेंट्स्‌ होतात त्यांचाहि नीट अर्थ कळत नाही. माझी कल्पना अशी होती को विमानतळावर खूप अधिकारी असतील. कुणी पासपोर्ट पाहील, कुणी इन्कम-टॅक्स क्लिअरन्स सर्टिफिकेट पाहील, कुणी हडत्‌हुडत्‌ करेल, वगैरे; पण एकहि सरकारी किंवा विमानकंपन्यांचा अधिकारी तिथें नव्हता. पोलीस कुठेहि दृष्टि-पथात आला नाही. जणू काय कोण अमेरिका सोडून जातो याला कांही महत्त्व नाही. अमेरिकेत शिरताना मात्र केवढी कसून तपासणी होते! आणि जाताना? जा वापडे. कोण विचारतो! साहजिकच आहे. अमेरिकेला जायला सर्वजण उत्सुक, तेव्हां त्यावेळी कसून तपासणी. अमेरिका सोडून जातांना कोण काय घेऊन जातो याची कोणी पर्वा करीत नाही. मला थोडं वैषम्यच वाटलं. आपण येवढी अमे-रिका सोडून चाललो व सरकार दरबारी त्याची दखल नाही म्हणजे काय?

मार्गदर्शक फलक पाहात पाहात, वाट पुसत पुसत, पावणे दहाच्या सुमाराला मी एका दाराच्या तोंडाशी गेलो व अकस्मात्‌ एका गणवेशधारी सुंदर मुलीनं 'गुड्‌ ईव्हिनिंग' केलं. मी समोर पाहिलं तर खुर्च्या दिसायला लागल्या. म्हणजे मी विमानातच आलो की काय? विमानतळावर थोडं चालून, शिडीवरून

विमानात जायचं अशी माझी कल्पना होती. तसं तर मी कांही केलं नव्हतं- इमारतीतून सरळ चालत आलो ते विमानातच.. हे खरोखरच विमान आहे का? असं त्या सुंदरीला विचारणं गावंढळपणाचं दिसलं असतं. तरी 'I think I am on B. O. A. C. jet for London' असं त्या 'होस्टेस'ला (आता त्यांना स्टयूअरडेस म्हणायला लागले आहेत) म्हणालो. 'yes sir, you are' असं तिनं म्हणताच तिनं दाखविलेल्या खिडकी शेजारच्या खुर्चीत बसलो.

मी आतून विमान पूर्वी कधीच पाहिलं नव्हतं, आणि आता पाहिलं ते बोअिंग ७०७ जेट. आतून ते किती प्रचंड असतं याची कल्पना आत गेल्याशिवाय येणार नाही. दोन्ही बाजूंना तीन तीन खुर्च्या होत्या व मधे प्रशस्त वाट होती. बसमधे असते तशी सामान ठेवायला वर बर्थ होती. मी मोजले त्याप्रमाणे १८० उतारू त्या विमानात बसू शकत होते. विमानाच्या मागे तीन बाथरूम्स, एक स्वयंपाकाची खोली, एक औषधे वगैरेची खोली होती. प्रवाश्यांचे दोन वर्ग होते. एंजिनाच्या मागे अप्पर क्लास व आमचा टूरिस्ट क्लास. अप्पर क्लासमधे चोवीस जागा असाव्या. त्यांची वेगळी केबिन होती. त्यांना विशेष काय सोयी असतील याची मला कल्पना नाही. आमचा क्लासहि फार सोयिस्कर होता एवढं खरं.

त्या प्रचंड विमानात फार तर आम्ही साठ–सत्तरजण असू. बहुतेक विमान कंपन्या तोटयात चालल्या आहेत असं म्हणतात. दहाला एकदोन मिनिटं कमी असताना एअर होस्टेसनं लाउड स्पीकर वरून सर्वांचं स्वागत केलं, कॅप्टन व इतर क्रूचा परिचय करून दिला. विमान ताशी किती मैल वेगानं, किती उंची वरून जाईल, उड्डाणाचा वेळ किती राहील, आणि लंडन विमानतळावर स्थानिक वेळेनुसार किती वाजता पोचेल याची माहिती सांगितली. आणि शुभचिंतन करून पट्टे बांधायची व सिगारेटी विझवण्याची विनंती केली. प्रत्येक सीट समोर वरच्या बर्थला बसवलेल्या पट्टीवर 'पट्टे बांधा व सिगारेटी विझवा' अशी सूचना दिव्यांच्या सहाय्यानं चमकत होती.

बरोबर दहा वाजतां विमानाचे प्रचंड पंखे घरघरायला लागले. दोनतीन मिनिटातच विमान चालायला लागले. दोघातिघा स्टयूअर्डसनी सर्वांना पेपर- मिंटाच्या वडया दिल्या. रात्रीच्या वेळी विमानाचा मार्ग कप्तानाला बरोबर कळावा म्हणून मार्गावर दुतर्फा निळे दिवे प्रकाशमान करण्यात आले होते. दोन- तीन वळणं घेऊन विमान एका ठिकाणी आले व किंचित् थांबल्यासारखे होऊन रोंऽऽ असा मोठा आवाज करीत वेगानं धावायला लागले. वेग सारखा वाढतच

(पृष्ट १६ वर)

पोत— एक परीक्षण

लेः—श्री. ब. स. येरकुंटवार

सुप्रसिद्ध चित्रकार श्री. गोडसे यांनी 'पोत' या नांवाचं एक छोटंसं पुस्तक लिहिलं आहे. सुंदर छपाईचं हे पुस्तक जवळ जवळ सव्वाशे पानाचंच असलं, तरी ते अनेक दृष्टींनी वाचनीय आहे. कलामीमांसेचा एक धाडसी व महत्त्वाकांक्षी प्रयत्न म्हणून या पुस्तकाचं स्वागत करायला हवे. ही विशेषणं मी याकरिता वापरतो, की मानवी इतिहासाचा विस्तृत कालखंड व अनेक विषयांचे गुंतलेले धागेदोरे श्री. गोडसे यांनी हाताळले आहेत व तेहि एक प्रकारच्या आत्मविश्वासाच्या निर्धारानं हाताळले आहेत !

श्री. गोडसे यांचे विवेचन थोडक्यात असं: पोत म्हणजे इंग्रजीत ज्याला texture म्हणतात ते. कलेत कसं असतं व त्या दृष्टीनं कलेचे घटक कोणकोणते पडतात याचं ते प्रारंभी विवेचन करतात. पुढे त्यांचं म्हणणं असं, की सृष्टीत हत्ती सारखा आकारानं, पराक्रमानं, गुणानं अजस्र व आदर्श प्राणी कोणताच नाही. तेव्हां अशा या अद्वितीय प्राण्याचं मानवानं वेळोवेळी चित्र, शिल्प इ. रूपात जे आलेखन करून ठेवलं आहे, ते कलेच्या श्रेष्ठ—कनिष्ठतेचं गमक व द्योतक आहे. भारतीय इतिहासात बौद्धांच्या छद्दंत म्हणजे षड्दंत जातकाचं शिल्प व चित्र यात जे चित्रण झालं आहे, त्यावरून त्यांनी भारतीय कलांचं पोत अभ्यासलं आहे. त्यांनी असं दाखविलं आहे, की भरहुत येथील शिल्प निसर्गनिष्ठ चित्रण करतं, सांचीपासून चित्रणाची आदर्शावस्था सुरू होते. म्हणजे कलावंत निसर्गापासून अलग होऊ लागला आहे व मानवी मनाची निर्मिति त्यात मिसळली गेली आहे. निसर्गबाह्य आदर्श त्यात येऊ लागले. अमरावती, करमार येथील छद्दंत जातकाची शिल्पं याच अवस्थेतली आहेत. असं होता होता अजंठ्याच्या चित्रात मधल्या श्रेणीचं छद्दंत जातकात संकेतावस्था आली. निसर्गनिष्ठेपासून उत्तरोत्तर दूर नेणारी संकेतावस्था विलगीकरणाच्या अवस्थेत परिणत झाली व तिचा पुरावा म्हणजे हत्तीला देवाचं रूप देऊन पूज्य बनविला गेलेला विघ्नराज धुंडिराज "गणराज गजानन". वाङ्मयातील संकेतावस्था व विलगीकरणाची अवस्था यांचं मध्यंतर म्हणजे श्रीज्ञानेश्वरी व महानुभावी कवि भास्करभट्ट यांचं शिशुपालवध हे काव्य ! सिंहाला वर चढवून हत्तीचा उत्तुंग अनादर, नव्हे त्याचा अपमान या कवींनी केला आहे, असा श्री. गोडसे यांचा जोराचा आक्षेप आहे.

या ग्रंथाचं परीक्षण भाषा, माहिती, इतिहास व कला–मीमांसा या चार दृष्टींनी करणं इष्ट होईल.

तत्पूर्वी, एका गोष्टीचा निर्देश केला पाहिजे. कलेच्या घटकांचा लेखकाने मांडलेला विचार निर्जीव व यांत्रिक आहे, सजीव एकात्म नाही.

कांही कांही ठिकाणची शब्दयोजना व वाक्यरचना लेखकाच्या कलानैपुण्यास शोभणारी आहे हे जितकं खरं, तितकंच हेहि खरं, की कित्येक ठिकाणचे शब्द व वाक्य कलाहीन व अर्थहीन आहेत. रेघवणं, मृदुमुलायम, मृदुमवाळ, चढचा, प्राक्प्राचीन इ. शब्द सुग्रास अन्नाच्या घासात खडा चावला जावा त्या प्रमाणं विरस करतात. पटनिविष्ट, ऐन चढाईत, भावविभाव, हत्तीचा खचलाटांच्या कडेकपाऱ्यातून इ. चुकीचे शब्दप्रयोग प्रतिपादनाच्या कलात्मकतेत चिखल कालवितात. पुनरुक्ति, पाल्हाळ, विशेषणांची गर्दी, अतिरेक, अवास्तवता इ. ज्या गोष्टींना लेखक सांकेतिक अवस्थेचे गमक समजतो, त्या सर्व 'पोत' मध्येच पाहायला सांपडतात हे पाहून मौज वाटते. उदा. 'विस्मृतीच्या निःशब्द वहिऱ्या, काळोखांत', 'उद्दाम अहंमन्य, औद्धत्य', 'लढाऊ विजिगीषु', 'आकाशाचे अफाट अंतराळ', इ. इ. निसर्गवाह्यता तर लेखकानं जवळ जवळ पावलो पावली दाखविली आहे. आपण एक वाक्य नमुन्याकरिता घेऊ. भास्कर भट्टाच्या काव्याबद्दल लिहिताना लेखक म्हणतो, 'सुधारसांत घोळलेल्या, चांदण्यात चुंबळलेल्या आणि, चांपयाच्या तलम परिमलाने ओवलेल्या साहित्याला. . . .' इ. आता यात निसर्गनिष्ठा किती आहे ते सांगायला नकोच ! जाणीव हा शब्द ग्रंथभर वापरलेला आहे. तो मराठी वाचकांना वुचकळ्यात टाकतो. कारण इंग्रजी 'consciousness' या शब्दात जो भावार्थ आहे, तो जाणीव या शब्दात नाही.

भाषेतील वैगुण्यापेक्षाहि माहितीचं वैगुण्य अभ्यासकांस फार बोचतं, हे स्पष्टच म्हणायला हवं. कांही उदाहरणं घेऊ. लेखक गजानन देवतेला सातव्या शतकात ठेवतो. मूर्तिविज्ञान, संस्कृत वाङ्मय, बौद्ध वाङ्मय, वैदिक सूत्र वाङ्मय, वेदवाङ्मय इ. पुरावे इतके बळकट व भक्कम आहेत, की श्री. गोडसे यांना वाटणारा ओंगळ तंत्राने माखलेला बेडौल 'धुंडिराज' निर्विवादपणें ऋग्वेदकाळाजवळ जातोच जातो. तो त्याहि वेळी 'लंबोदर' व 'हस्तिमुख' म्हणूनच वर्णिला गेला आहे. ही एकच गोष्ट श्री. गोडसे यांची कलामीमांसा व त्यातील उत्क्रांतीचं लेखाटन पत्त्याच्या डोलाऱ्याप्रमाणे कोलमडून टाकते. भास हा कवि लेखकाला मोठा निसर्गनिष्ठ वाटतो; कारण त्यानं हत्तीचं वस्तुनिष्ठ चित्रण केलं आहे. लेखकाचं दुर्दैव असं, की भासाची म्हणून निश्चित ठरणाऱ्या नाटकांतच त्यानं सुबद्ध लेखलेले संकेतच काय, पण त्याला निसर्गविरुद्ध वाटणारं गजान्तक सिंहाचं चित्रणहि आहे. उदा. 'स्वप्नवासवदत्त' या नाटकाचा जणु पूर्वार्ध असलेलं

'प्रतिज्ञायौगंधरायण' हे नाटक पहा. भासाचा काळ भरहुतच्या शिल्पाच्या आधीचा आहे. याचा अर्थ असा होतो, की निसर्गनिष्ठेची अवस्था व सांकेतिक अवस्था या निदान समकालीन तरी होत्या. म्हणजे पुनः श्री. गोडसे यांचं प्रमेय धुळीसच मिळतं. लेखकानं हे बिलकुल लक्षात घेतलेलं दिसत नाही, की ऋग्वेदापासून वैदिकांच्या वाङ्मयात सिंहाचं चित्रण, श्री ज्ञानेश्वर करतात, त्याप्रमाणं केलं आहे. इतकंच नव्हे, तर ज्या शिल्पांचा आधार आपल्या प्रमेयसिद्धीकरिता लेखक घेतो, त्या शिल्पामध्ये बौद्ध कलाकारांनी हत्तीबरोबर सिंहहि चित्रित केला आहे. अशोककालीन शिल्प, सांचीचं शिल्प, पुढील अनेक बुद्धप्रतिमा यांत सिंहाचं चित्रण झालं आहे. बुद्धप्रतिमांशी सिंह निगडित करण्यात सांकेतिकताच आहे.

इतिहासाच्या दृष्टीनं एक दोन गोष्टींचा उल्लेख करून कलामीमांसेकडे वळू. पहिली गोष्ट ही, की त्यानं पश्चिम युरोपमध्ये आढळून येणाऱ्या मानवी विकासाच्या टप्प्यांच्या पायावर भारतीय इतिहास उभा केला आहे. आणि वस्तुस्थिति अशी आहे, की ही दृष्टि शास्त्रीय व वास्तविक आहे किंवा नाही हेच मुळी अतिशय संदिग्ध आहे. मानवी इतिहासाच्या वाढीचे क्रम एकाच काळी वेगवेगळ्या दिशांनी झाले असले पाहिजेत अथवा तसं होणंहि फार संभवनीय आहे, हे शास्त्रज्ञांना वाटू लागलं आहे. ही गोष्ट लक्षात घेतली, की भारतीय कलांचा इतिहासहि आपल्याला स्वतंत्र पायावर उभा केला पाहिजे याची निकड वाटू लागेल. इतिहासाच्या दृष्टीनं उल्लेखण्याजोगी गोष्ट विशेषतः श्रीज्ञानेश्वराबद्दल. महानुभावी ग्रंथांना ऐतिहासिकदृष्ट्या किती महत्त्व आहे याची चर्चा न करताच, अनेक उलथापालथी व संस्करणं यातून गेलेल्या ग्रंथांच्या आधारावर लेखकानं यादवकालीन इतिहासाचं चित्र रेखाटलं आहे. एकच ठळक गोष्ट सांगतो. अल्लाउद्दिनच्या व त्यानंतरच्या स्वाऱ्यांनी उघड झालेल्या यादवांच्या लष्करी सामर्थ्याचं चित्र त्यांच्यापूर्वी लिहिलेल्या श्रीज्ञानेश्वरीत उमटलं आहे असं अट्टाहासानं दाखविणं म्हणजे इतिहासास बेदरकारपणे तुडविणंच आहे!

आता कलामीमांसा पाहू. भारतीय कलांच्या विकासाचे टप्पे सांगण्यात श्री. गोडसे यांचं वैशिष्ट्य नाही. ते पूर्वीपासूनच पुष्कळशा पाश्चात्य अभ्यासकांनी व त्यांची री ओढणाऱ्या स्वकीय अभ्यासकांनी दाखविलेच आहेत. त्यांचं वैशिष्ट्य हत्तीच्या चित्रणाची किल्ली शोधून काढण्यात आहे. माझ्या मते त्यांच्या सहेतुक निवडीमुळेच षड्दंत जातकाच्या चित्रणावरून भारतीय कलांच्या अवस्थांचा भास त्यांना झाला आहे. एकतर तत्कालीन कलावंत सृष्टीचं व हत्तीचं चित्रण करीत नव्हते तर जातकांचं चित्रण करीत होते, हे लक्षात घेणं अवश्य आहे. दुसरं असं, की कलांचे अवशेषच तुटपुंजे व एकांगी आहेत. बौद्धाव्यतिरिक्त इतर समाजांचे

अनुक्रमणिका

कलावशेष फारसे कुठं आहेत ? म्हणूनच ते तत्कालीन कलांचे प्रतिनिधि समजता येत नाहीत. आपली कलामीमांसा करताना लेखकानं कित्येक मूलभूत महत्त्वाच्या गोष्टी लक्षात घेतल्या नाहीत. त्याला प्रथम हे विचारणं भाग आहे, की निसर्ग म्हणजे तरी काय ? लेखकाला जेवढा निसर्ग वाटतो तेवढाच अस्तित्वात आहे असं नाही. निसर्गाचं ज्ञान ज्याचं जसं असेल तसं तो त्याचं चित्रण करील. त्यामुळं ऐहिक, जडवादी इ. ठोकळेबाज व अर्धवट कल्पनांनी निसर्ग मर्यादित करणं इष्ट नाही, शास्त्रीयहि नाही. आजच्या अत्यंत प्रगत पदार्थविज्ञानानं पूर्वीच्या स्थूल, जड, यांत्रिक निसर्गाचं चित्रण अपुरं ठरविलं आहेच. कांही यांच्याहि पुढं जाऊन निसर्गाचं जास्त सूक्ष्म व व्यापक स्वरूप ओळखू शकतील. निसर्गात जसा हत्ती आहे, तसाच सिंहहि आहे. निसर्गात प्रवृत्ति आहे, तशीच निवृत्तीहि आहे. निसर्गात काय नाही ? तेव्हां, निसर्गचित्रण म्हटलं, तरी त्यात सर्वच प्रकार संभवतात, हे ओळखलं पाहिजे. त्यात ऐहिक, जडवादी अशी लेबलं संभवतात, तशीच पारलौकिक, चेतनवादी हीहि संभवतात. माणूसच घेतला तर त्याला असलेलं मन, त्यानं निर्माण केलेले आदर्श व संकेत, हेहि निसर्गच आहेत ! तेव्हां निसर्गनिष्ठ या घोपट शब्दाला फारशी किंमत देण्यात स्वारस्य नाही. जीवननिष्ठा या शब्दाचंहि असंच !!

कलावंत आपली कला तत्कालीन वृत्ति म्हणजे mood, वंद्यातली निकड, स्पर्धा, अनुकरण इ. च्या प्रेरणांनी निर्माण करितो; आणि त्या सर्वांच्या बुडाशी तत्कालीन श्रद्धा, समजुती, भाव, तात्त्विक कल्पना, फॅशन्स इ. असतात. कलावंताच्या निर्माणक्षमतेस म्हणजे creativity ला कलामीमांसेत प्रधान स्थान असायला हवं. म्हणून तत्कालीन जीवनाचं प्रतिबिंब कलेत पहाताना जपूनच पवित्रा टाकला पाहिजे. उदा. भरहुतचं शिल्प. कोरीव लेखात म्हटल्या प्रमाणे, शुंगांच्या राजवटीत अस्तित्वात आलं. आता त्यात कोणाच्या जीवनाचं प्रतिबिंब पाह्यचं ? बौद्धांचं की वैदिकांचं ? शुंग वैदिक होते. गुप्तकाळाचंहि असंच म्हणता येईल. इथं मला हे सुचवून ठेवावसं वाटतं, की ब्राह्मणी हा पाश्चात्य अभ्यासकांनी निर्मिलेला व आमच्या अभ्यासकांनी मांडीवर खेळविलेला शब्द झुगारून द्यायला हवा !

आणखीहि एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यायला हवी. भरहुतच्या पूर्वी भारतात शिल्प व चित्र यांची कला प्रगत अवस्थेत अस्तित्वात होती, हे प्राचीन संस्कृत व बौद्ध वाङ्मयावरून दिसतं. त्याचं मूल्यमापन करता आल्याशिवाय कलेच्या विकासाचे टप्पे ठरविणं अयोग्य होईल. पुन: असं, की कलेचं उपादान कारण म्हणजे माती, दगड, धातु, लाकूड, हस्तिदंत इ. च्या संबंधान व्यक्त झालेली कला, परस्परावर कोणता प्रकाश टाकते हे पाह्यल्याशिवाय व या सर्वांचा तत्का-

लीन वाङ्मयाशी व त्यात व्यक्त झालेल्या संस्कृतीशी कसा मेळ बसतो; हे दाख विल्याशिवाय अवस्थांचा विचार करणंच मुळी चूक आहे. तसंच दगडाच्या संबंधान कलेत दिसून येणारे टप्पे हे सर्व कलेचे टप्पे होतीलच असं नव्हे ! असो

श्रीज्ञानेश्वराच्या वाङ्मयाचा विचार करताना श्री. गोंडसे यांची चूक अशी झाली आहे, की शृंगाराच्या माथा शात बसविण्याची श्रीज्ञानेश्वराची जी प्रतिज्ञा आहे, तिच्या दृष्टीनेच त्यानी कलामीमासा करायला हवी होती. श्रीज्ञानेश्वर कथाकार नव्हते. तसं समजून केलेल विश्लेषण भ्रामक व अशास्त्रीय झालं आहे !

सारांश असा की 'पोत' या पुस्तकाचं पोत विरविरीत आहे हे नमूद करताना वाईट वाटतं. अधिक सखोल पाण्यात शिरले असते, तर श्री. गोडसे याचं घाडस चिरस्मरणीय ठरलं असतं ! तरीहि हे पुस्तक अभ्यास करण्याजोगं आहे यात शंका नाही.

—नागपूर आकाशवाणीच्या सौजन्याने

परत मातृभूमीला (पृष्ठ ११ वरून)

गेला व एका क्षणी विमानानं हवेत झेप घेतल्याचं जाणवलं. जमिनीवर होणारा चाकाचा आवाज थांबला व आपण संथपणानं तरंगत आहोत हे जाणवलं. सर्वत्र शांत झालं. मी खिडकीतून खाली पाहिलं. अंधारात दिवे चमकत होते. एखाद्या दरीत वस्ती असावी व आपण काठावरून खाली पाहावं असा भास झाला. पाहता पाहता विमान वर चढलं व एक वळण घेऊन अॅटलांटिक महासागरावर आलं. खाली आजूबाजूला, सर्वत्र अंधार पसरला. बाहेरचं कांही दिसेनासं झालं तेव्हा मी आत दृष्टि वळवली. आजूबाजूला पाहिलं तो सराईत प्रवाश्यांनी पट्टे सोडले होते व धूम्रपानाला सुरुवात केली होती. मीहि पट्टा सोडला व relax होण्याचा प्रयत्न करू लागलो. आणि एकदम जाणवलं, आपण अमेरिका सोडून निघालो. (अपूर्ण)

वर्षा

सौंदर्याची भाषा ज्याची वक्तृत्वा त्याच्या पूर–
येउनि, भरला गहिवरुनीया सृष्टीचा वाटे ऊर! ध्रु०
जिकडे तिकडे जलसंचय हे हिरव्या हिरव्या रानात
प्रभात–संध्या ह्यांची पडती प्रतिबिंबे ह्या पाण्यात
विशाल तरुच्या खाली गळती टपटप बिंदू पाण्याचे
तरू झेलितो वृष्टी, तरि हे सोडिति आश्रय पानांचे
तरुच्या खाली असे कोरडे, आश्रय पांथ तिथे घेती
कांही भिजली कांही सुकली वस्त्रे पिळुनी पांघरती
सळसळ सळसळ शब्द होतसे वृक्षांवर वृष्टी पडता
वीज चमकता डोळे दिपती दिवसा काळोखी जाता?
खळखळ ओढे उसळत पळती आनंदाने बेभूल
आनंदाने आज हरपला सृष्टीचा सारा तोल! १
सर थांबे तं हिरव्या कुरणी तरूतुनी उतरुनि येती–
किती पांखरे! थवे तयांचे कांही वेचुनिया खाती
स्नाने करिती डबक्यामाजी पिवळे पडते जें ऊन्ह
प्रभात भासे सौम्यपणाने जरी असे हा माध्यान्ह
हरिण एकले कुठुनि पातले न कळे ह्याही रानात
मधेच चरते, मधेच बघते; ऐट फार तें मानेत
कुरणामाजी गायी चरती, पुच्छ सारखे हलवीती
पिवळे पाहुनि ऊन्ह वासरे उगिच उड्या मारित पळती
पुच्छ उभवुनी, मान उचलुनी, टवकारुनि मध्ये बघती
पुन्हा पुन्हा गोरस प्यायाते त्रास गायिते तो देती २
वृक्षाखाली वसे गुराखी; गाणे आनंदे गातो
गोटे घेउनि ताल धरीतो, भान सुखाने विसरे तो!
छाया सारी गर्द पसरली गाणाराचे भवताली
करिति कवडसे काम जरीचे हरित तृणावर मखमाली
हिरव्या रानी कुठे दुरूनी कुणी एकला जात असे
चैतन्याचा किरण काय हा पाचूवर ह्या पडलासे?
रान शोभले चित्ररत्नाने; तोहि तयें शोभा लाहे
सौंदर्याच्या वक्तृत्वाला पूर असा आला आहे
चैतन्याचा प्रवास चाले जडातुनी ह्या सृष्टीत
रंगुनि गेले परस्परांते रंजविता गुजगोष्टीत! ३

कविभूषण—प्रा. बळवंत गणेश खापर्डे

अनुक्रमणिका

जन्मोजन्मीचे चिरमीलन...

जन्मोजन्मीचे चिरमीलन अपुल्या आत्म्यांचे होते ना ?
अनेक जन्मांचे नी बंधन हवे आपणा होते ना ?
वृक्षावर वेलीसी होती माझ्यावरती विसंबून जी
छायेसी–छे ! ती दिवसा; ही रात्रीला घनतमी ना त्यजी
स्मरण फुलांची गोड मालिका नित्यनूतना अजूनी ताजी
कां दैवाने वैर साधले, अपुली कां केली ही दैना !

म्हणायची तूं आपण पाहूं दोघे मिळूनी नातूपणतू
नवा नवा आनंद अनुभवू छान करू संसार परंतु
आकस्मिक हे घडले कैसे मी एकाकी येथे अन् तू–
पिंजऱ्यामधुनी उडून गेलिस पंचपंच प्राणांची मैना !

मजजवळी असताना गे तूं दचकत होतिस कधी भयाने
जागताच स्मित होते झळकत मला पाहुनी आणि शोभने
आणिक लाजत मला सांगसी "उगाच मी भ्याले स्वप्नाने"
पलिकडचा अंधार भयानक तिथे एकटी तूं गेलिस अन्
अंतरंगीचे गूज एकहि लपविलेस मजपासून का गे––
जीवन मरणाचे ते अपुले होते ना विणलेले धागे
एक इशारा द्याया इतुका येना एकवेळ अनुरागे
"राहा सुखे पण याल तेधवा मी तुमची येथे आहे ना" ?

–या. मु. पाठक

एक रात

इथे अंधार तिथे अंधार सारा अंधार पापणीत
एक साउली वाट चुकली ठेच लागली काळजात
घर घुमले नभ रंगले रंग संपले क्षितिजात
पंख अंकुरे डंख झंकारे धग अंगारे पाउलात
थेंब तृष्णेचा डोह भरला ओठ सुकला चिंवपणी
मन ओढाळ स्वप्नमधाळ हेतुगहाळ आठवणी
खुळचा वर्तुळी सूरकमळी मौन झळाळी पालवत
असा अंधार तुझा आधार माझा निर्धार एकरात
इथे अंधार तिथे अंधार सारा अंधार पापणीत
एक साउली वाट चुकली ठेच लागली काळजात !

–र... महाजन

वेरूळ–अंजठा : पाषाणात्मा

आहे काळ उभा पहा अचलसा निस्पंद येथे कला
पाही कौतुक या उदात्त कृतिचे साकार शून्यातुनी !
छन्नीचे घुमते अजून भवती संगीत स्वर्गीय ते,
पाषाणात अशी फुले फुलविली अम्लान येथे कुणी ?
येथे अद्भुत, शांत, भक्ति रस हे ध्यानस्थ झाले कसे !
शिल्पाची सरिता कुणा हृदयि ही ओसंडुनी वाहली ?
येथे फत्तरही सजीव, वदती शब्दाविना माधुरी;
पाषाणात कुणी इथे मयसभा जादूभरी ओतली ?
* * *
आला काय इथे महीवर कधी तो विश्वकर्मा तरी ?
कोणी प्रेमभरे अशी घडविली ही भूसतीची सरी ?
स्वर्गातून कधी पऱ्या उतरल्या पंखावरी घेउनी
शिल्पाची सुमने, इथेच रचुनी गेल्या वरी सुन्दरी ?
* * *
देवाचे मजला कधी न दिसले अस्तित्व मूर्तीमधे
येथे मात्र गमे खरेच मजला आत्मा फुटे फत्तरां !
* * *

–प्रा. हि. ए. चव्हाण

प्रकाश महाल

तुझा प्रकाश महाल
त्याला काळोखाचे स्तंभ
तुझ्या तिथे पाहिला मी
अंतापासून आरंभ !
धुंद पुनवेस पडे
कृष्ण अवसेची मिठी
अंग चोरुनी निखारे
कळचापाकळचांच्या ओठी !
कधी बिंदूचा आसरा
शोधी अथांग सागर
उजाडल्या माळरानी
फुले वसंत मोहर !

फूल फुलण्या आधीच
कधी करपतो देठ
गारव्यानेहि पोळती
कधी धरतीचे ओठ !
ज्ञात अज्ञाताच्या सीमा
जीवाशिवाचे मीलन
द्वैताद्वैतातुनी वाहे
आत्मस्वरूपी चैतन्य !
अंधाराच्या गर्भातही
दिव्य सृजनाच्या कळा
तुझ्या प्रकाश महाली
असा अनोखा सोहळा !

–कृष्णा चौधरी
(नागपूर नभोवाणीच्या सौजन्याने)

अनुक्रमणिका

परकीयांच्या लिखाणात प्रतिबिंबित झालेले

श्री शिवाजी महाराज

ले.—प्रा. श्री. मा. कुलकर्णी

परकीयांच्या लिखाणात प्रतिबिंबित झालेले श्री शिवाजी महाराजांचे चित्र व चरित्र शंभर टक्के विश्वसनीय मानता येत नाही. कारणे अनेक संभवतात. लिहिणाऱ्या व्यक्तीचे ज्ञान, त्याचा संबंध, त्याचा हेतु या सर्वांचा विचार त्याच्या लिखाणाची विश्वसनीयता ठरविताना प्रस्तुत ठरतो. या सर्वांचा विचार केला असताहि परकीयांच्या लिखाणाचे महत्व कांही बाबतीत मान्य करावे लागते.

शिवाजी महाराजांच्या धाडसी कृत्यांनी व चतुर धोरणीपणाने अनेक समकालीन इंग्रज, फ्रेंच, डच, पोर्तुगीज व इटालियन प्रवाश्यांना व व्यापाऱ्यांना आकर्षित केले होते व त्यांची नोंद या लेखकांनी आपल्या प्रवास वर्णनात, रोजनिशीत वा अहवालात करून ठेवलेली आढळते. आरंभी आरंभीच्या कांही लेखकांनी शिवाजी संबंधी कांही नमूनेदार चुकीची विधाने केलेली आढळतात. उदा. शिवाजी हा मोगल होता, प्राचीन भारतीय सम्राटांचा वंशज व मोगलांचा नातेवाईक होता. इ. शिवाजीने केलेली सुरतेची लूट ही तर स्वाभाविकच अनेकांच्या लिखाणात उल्लेखित आहे. आणि 'भयप्रद लुटारू' म्हणूनच कित्येकांनी शिवाजीचा उल्लेख केलेला आहे. अर्थात् अशा चुका एकप्रकारे अपरिहार्यच मानल्या पाहिजेत. परंतु अधिक जाणकार व वरच्या दर्जाच्या लेखकांनी हे ओळखलं होतं की शिवाजी हा केवळ एक लुटारू व बंडखोर नसून थोर सेनापति व महान मुत्सद्दी असा श्रेष्ठ पुरूष आहे. अशा जाणकार निरीक्षकांनी जे लिहून ठेवले त्याचा या महापुरूषाच्या चरित्रासाठी फार उपयोग आहे. या परकीय लेखकात अनेक सुशिक्षित व जाणते लेखक आहेत. उदाहरणार्थ, फ्रायर (Fryer), बर्नियर (Bernier), डेलन (Dellan) हे डॉक्टर ऑफ मेडिसिन म्हणजे वैद्य होते, (Thevenot) हा व्यापक सांस्कृतिक अभिरूचीचा गृहस्थ होता; कॅरे (Carre), ऑव्हिंग्टन (Ovington) हे पाद्री होते. अज्ञानामुळे यांच्याकडून अनेक गंभीर चुका झालेल्या असल्या तरी समकालीनांनी केलेलं लिखाण म्हणून या सर्वांच्या लिखाणाला महत्व आहे.

या सर्वांनीच कांही शिवाजीसंबंधी सविस्तर लिहिलेले नाही. कांहींनी केवळ ओझरता उल्लेख केला तर थेवनॉट, कॅरे यांच्यासारख्या कांहींनी एखाद

अनुक्रमणिका

दुसरे प्रकरण शिवाजीला वाहिले. कॉस्मा द गार्दा (Cosme da Guarda) या गोमंतस्थ पोर्तुगीज लेखकाने मात्र शिवाजीचे पद्धतशीर चरित्र लिहिण्याचा प्रयत्न केला. या सर्वांच्या लिखाणात प्रतिबिंबित झालेले श्रीशिवाजी महाराजांचे चित्र थोडक्यात पाहण्याचा आपण प्रयत्न करू.

थेवनॉटने आपल्या प्रवासवृत्तात शिवाजी संबंधी कांही माहिती दिली आहे. सुरतेची लूट, शाहिस्ताखानाचे प्रकरण, आग्र्याहून सुटका इ. प्रकरणांचा उल्लेख त्याने केला आहे. शिवाजी आग्र्याहून निसटल्याचे वर्णन केल्यानंतर हा लेखक शिवाजीच्या व्यक्तित्वासंबंधी लिहितो, "This Raja is short and Tawny, with quick eyes that shew a great deal of wit. He eats but once a day Commonly and is in good health;..."

—Foreign Biographies of Shivaji Vol. 11 pp 184

"हा राजा ठेंगण्या बांध्याचा आहे. त्याचे डोळे तेजस्वी असून त्यातून त्याची बुद्धिमत्ता प्रगट होते. तो सामान्यत: दिवसातून एकदाच जेवतो आणि [तरीहि] त्याचे आरोग्य उत्तम आहे." कॉस्मो द गार्दा यानेहि शिवाजीच्या आकर्षक व्यक्तिमत्वाचा, विशेषत: काळयाभोर विशाल नेत्रांचा व भेदक दृष्टीचा आणि तरल, तीक्ष्ण व निर्णायक बुद्धिमत्तेचा उल्लेख केलेला आहे.—(English Records on Shivaji Vol. II Pp. 334)

इंग्रजांचा वकील हेन्री ऑक्झिडेन हा तर शिवरायाच्या राज्यभिषेकाच्या वेळी सिंहासनाच्या अगदी जवळ, भेट देण्याच्या निमित्ताने शिवरायाच्याच आज्ञे-वरून, गेलेला होता. त्या कांही क्षणात त्याने शिवरायाचे जे रूप न्याहाळले त्यावरून तो वर्णन करतो की, "शिवाजीचा चेहरा सुंदर, वर्ण इतर मराठयांच्या मानाने गोरा, डोळे तीक्ष्ण, नाक लांब व बाकदार, दाढी कापून हनुवटीच्या खाली टोकदार केलेली, मिशी बारीक आणि मुद्रेत त्वरा, निश्चय कठोरपणा व जागरूकता हे गुण स्पष्ट दिसतात."

शिवाजीचे नुसते नांवहि शत्रूंना इतके भयप्रद झाले होते की या भयाचे देखील प्रतिबिंब परकीय लेखकांच्या लिखाणात पडल्याशिवाय राहिले नाही. सुरतेच्या लूटीच्या प्रसंगाचे वर्णन करताना कॉस्मा द गार्दा लिहितो, "या भागात शिवाजीला यत्किंचितहि प्रतिकार झाला नाही. त्याच्या विषयी असा आदर व असे भय सर्वांना वाटे की त्याचे नुसते नांव उच्चारणेहि मोठयात मोठ्या संकटातून पार पडण्याला पुरेसे होते." (F.B.S. Pp. 74) मात्र त्यावरोबरच शिवाजीची नीतिमत्ता व शिस्त यांचाहि परिचय लोकांना झालेला होता. हाच लेखक याच संदर्भात पुढे लिहितो, "पुरूष, स्त्रिया व मुले सैरावैरा धावत सुटली.

पण कोणालाहि जीव गमाविण्याचे भय नव्हते. कारण शिवाजीची अशी दृढ आज्ञा होती की प्रतिकार करणाराखेरीज कुणालाहि ठार मारायचे नाही. आणि ज्याअर्थी कोणीच प्रतिकार केला नाही, कोणीच नष्ट झाला नाही." (सदर, पृ. ७५) डॉ. डेलॉननेहि शिवाजीसंबंधी लिहिताना या गोष्टीचा उल्लेख केला आहे. तो म्हणतो, "शिवाजीने आपल्या आसपासच्या शत्रूंच्या मनात असा कांही धाक उत्पन्न केला आहे की तो येणार म्हणताच गोवे शहर थरथरा कापू लागले. त्याने सुरतेच्या लोकांना अनेकवार आपल्या क्रोधाचे भयानक परिणाम भोगावयास लावले आहेत."

—English Records on Shivaji Vol. II letter 537

या प्रकारच्या धाकामुळे व विशेषत: शिवाजीच्या सैन्याच्या गूढ व त्वरापूर्ण हालचालीमुळे तत्कालीन समाजात कांही मजेदार समजूती पसरल्याचे या परकीयांच्या लिखाणावरून ध्यानात येते. ऑक्झिंडनने २६ जून १६६४ रोजी लिहिलेल्या एका पत्रात असे म्हटले आहे की, "शिवाजी आपल्या कुप्रसिद्ध चोऱ्यांच्या बाबतीत इतका प्रसिद्धपणे कुप्रसिद्ध आहे की त्याला पक्षयुक्त हवाई शरीर असल्याचे सांगण्यात येते. अन्यथा अनेक ठिकाणी एकाच वेळी तो असल्याचे जे सांगण्यात येते ते अशक्य ठरेल." (The English Factories in India, 1660-1664, P. 345). याच विषयासंबंधी कॉस्मा द गार्दा असे लिहितो की, "शिवाजी अनेकदा एकाच वेळी निरनिराळ्या ठिकाणी मोहिमा पाठवितो आणि त्या सर्वांत तोच सूत्रधार असल्याचे मानले जाते. तो आपल्या जागी दुसऱ्याची योजना करतो की तो एखादा जादूगार आहे की त्याच्या जागी एखादे सैतान काम करते हा प्रश्न अद्याप उकललेला नाही." याच्या पुढे त्याने स्वत:च्या मते संभाव्य कारण कोणते ते दिले आहे व ते पुष्कळसे तर्कशुद्ध आहे. मात्र लोकांच्या भोळेपणामुळे शिवाजी सर्वगत आहे असा समज त्याकाळी पसरला असल्याचे तो सांगतो ते लक्षणीय आहे. (Foreign Bigoraphies of Shivaji Vol. II P. 10-11.)

शिवाजीच्या पराक्रमासंबंधी अनेक परकीयांनी स्वानुभवाने लिहिले आहे तेहि पाहण्यासारखे आहे. पांडिचेरीचा फ्रेंच गव्हर्नर फ्रान्सिस मार्टिन (Francis Martin) याने १६७७ तील शिवाजीच्या कर्नाटक मोहिमेचा वृत्तान्त लिहून ठेवला आहे. त्यात शिवाजीच्या आगमनाच्या वार्तेने शेरखान लोदीची कशी दुर्दशा उडाली होती व तो फ्रेंचांना जरी संरक्षणाचे आश्वासन देत होता तरी स्वत:च तो कसा घाबरलेला होता व पळण्याची तयारी करीत होता याचे सुरस वर्णन केले आहे. इतकेच नव्हे तर शिवाजीच्या फौजांपुढे याचा निभाव लागणार नाही हे या फ्रेंच गव्हर्नरला इतके पक्के माहीत होते की शेरखानच्या बतावणीवर

आपला मुळीच विश्वास नव्हता हे त्याने अनेक वेळा लिहिले आहे. (Foreign Biographies of Shivaji Vol II p. 270, 272 etc.)

शेरखानाच्या सैनिकासंबंधी तो लिहितो, "...the mere name of Shivaji made them tremble" (सदर, पा. २८७) English Records on Shivaji Vol. II या ग्रंथात असे अनेक लेख आहेत की ज्यात शिवाजीच्या पराक्रमा संबंधी, सेनापतित्वा सबंधी, शौर्यासंबंधी लिहिलेले आढळते. कर्नाटक मोहिमेच्या संबंधात एका पत्रात असे म्हटले आहे की सीझर-प्रमाणेच शिवाजीने चंदी व तंजावर या दोन बळकट किल्ल्याच्या प्रदेशातील लोकांना 'पाहिले आणि जिंकले.' पुढे आणखी दोन किल्ले शिवाजीने घेतल्याचा उल्लेख करून या कामातील त्याचे प्राविण्य अलेक्झांडर दि ग्रेट पेक्षा मुळीच कमी नाही असे तो लिहितो. (Letter 272), आणखी अेका पत्रात असे म्हटले आहे की, "शिवाजी हा दुसरा सरटोरियसच आहे आणि हानिबॉलपेक्षा डावपेच योजण्याचे कामी तो यत्किंचितहि कमी नाही. (Letter 279), शिवाजीच्या व्यक्तिमत्वाच्या या पैलू संबंधी सुप्रसिद्ध इतिहासकार ऑर्मे (Orme) याच्या शब्दात समारोप करणे योग्य होईल. ते लिहितात, "Shivaji possessed all the qualities of a Commander. He spared no cost to obtain intelligence of all motions and intentions of his enemies......In personal activities he exceeded all the generals of whom there is record. No general ever traversed as much ground as he, at the head of armies. He met every emergency of peril how so ever sudden and extreme, with instant discernment and unshaken fortitude..." (Historical Fragments P. 93-94.)

"सेनापतीचे सर्वगुण शिवाजीच्या अंगी होते. शत्रूच्या सर्व हालचालींची व हेतूंची माहिती मिळविण्यासाठी तो वाटेल ते सर्व करीत असे. वैयक्तिक कार्यकुशलतेच्या बाबतीत सर्व ज्ञात सेनापतीपेक्षा तो वरचढ होता. सेनेचे नेतृत्व करताना त्याने जितका प्रदेश पायाखाली घातला तितका कोणीच घातला नाही. प्रत्येक संकटाला, मग ते कितीहि आकस्मिक व पराकोटीचे असो, त्याने दृढ निश्चयाने व अविचल धैर्याने तोंड दिले..."

शिवाजीने सैन्याला जी शिस्त लावली होती ती विलक्षण होती. या सैन्याच्या हालचाली फार त्वरेने होत असत. त्या तशा होऊ शकत याला कारण सैनिकांची साधी राहणी. कॉस्मा द गार्दा लिहितो, "दक्षिणी सैनिकांच्या द्रुत हालचालींचे कोणाला आश्चर्य वाटायला नको. कारण ते आपल्या बरोबर

अनुक्रमणिका

फारसे सामान घेत नाहीत. धनुष्यबाण, खड्ग, पट्टा आदि आयुधं, थोडीशी भाकर, घोड्यासाठी दाणा इतकेंच ते बरोबर वागवीत. गवत व पाणी तर कोठेहि उपलब्ध असे...त्यांच्या अंगावर एक कपडा असतो तो त्यांचा पोषाख, तेच अंथरूण व तेच पांघरूण. घोड्याचा लगाम हाताला बांधून ते जमीनीवर झोपतात. अशा रीतीने ते राहतात म्हणून ते इतके चपळ व चतुर आहेत...हे सर्व मोगलांच्या सैनिकांच्या अगदी विरुद्ध आहे. कमीत कमी एका उंटाचं तरी ओझं बरोबर असल्याशिवाय मोगल सैनिकाला संतोष वाटतच नाही. त्यामुळे एका मोगल सैनिकाचा बारदाना एका दक्षिणी सैनिकांच्या तुकडीला पुरेसा ठरतो."

—Foreign Biographies of Shivaji Vol II p. 99

शिवाजीच्या नीतिमत्तेसंबंधी एक उल्लेख पूर्वी आलाच आहे. शिवाजीला स्त्रीजातीविषयी अत्यंत आदर असल्याचे प्रसिद्धच आहे. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची हकीकत सर्वप्रसिद्ध आहे. ती इतिहाससिद्ध नाही असे कांही जणांना वाटते. या बाबी संबंधी कॉस्मा द गार्दा याने केलेला एक उल्लेख उद्बोधक वाटण्यासारखा आहे. शाहिस्तेखानाचे प्रकरण गार्दाने थोडे निराळे वर्णिले आहे. त्यात एका नेताजीचा त्याने उल्लेख केला आहे. हा नेताजी शाहिस्तेखानाच्या तंबूत जेव्हां शिरला तेव्हां तेथे अनेक स्त्रिया होत्या. त्याने त्यांच्या जवळ शाहिस्तेखानाची चौकशी केली. परंतु कोणाचाहि विनयभंग केला नाही. कॉस्मा द गार्दा लिहितो, "नेताजीने स्त्रियांचा यत्किंचितहि मानभंग केला नाही. कारण हिंदुस्थानात स्त्रीजाती विषयी विशेष आदर आहे आणि हे लोक आपल्या या चालीचे पालन युरोपियनांपेक्षा अधिक चांगल्या रीतीने करतात. या सैनिकांना तर असे करण्यास एक विशेष कारण होते. ते म्हणजे शिवाजीची आज्ञा. आणि शिवाजी आजीव प्रियहि होता व त्याची आज्ञाहि पाळली जात होती. आणि कोणीहि केव्हांहि जर त्याच्या आज्ञेचं उल्लंघन केलं तर शिक्षा अशी असे की फिरून तशी चूक होत नसे." सदर, पृ० ६८–६९.

काफीखानासारखा मुसलमान इतिहासकारहि शिवाजीच्या या उदात्त चारित्र्यासंबंधी असे लिहितो की, "त्याने असा नियम केला होता की जेव्हां त्याचे सैनिक लूट करण्यास जातील तेव्हां त्यांनी मशीदी, कुराण व कोणत्याहि स्त्रीला त्रास देऊ नये. जेव्हां केव्हां एखादी कुराणग्रंथाची प्रत त्याच्या हाती येत असे तेव्हां तिचा आदराने सांभाळ करून तो आपल्या एखाद्या मुसलमान अनुयायाला ती देत असे. कोणी हिंदु अगर मुसलमान स्त्रिया त्याच्या सैनिकांनी कैद केल्या आणि त्यांचा सांभाळ करणारे कोणी त्यांचे संबंधी जवळ नसले तर ते येऊन त्यांची हमी घेई पर्यंत शिवाजी त्यांची काळजी घेत असे."

—Elliot and Dawson Vol. 11 P. 260

शिवरायाचे रूप, त्यांचा प्रताप व त्यांची नीतिमत्ता यांचं ओझरतं दर्शन आतापर्यंत आपण घेतलं. आता त्यांच्या साक्षेपाविषयी हे परकीय काय लिहितात तेहि थोडेसे पाहू.

सैनिकांना लुटीत जे मिळत असे त्यातील सोनं व चांदी त्यांनी पूर्णतः शिवाजीला दिली पाहिजे अशी आज्ञा असे. हे अत्यंत काटेकोरपणे केलं जात असे. शिवाजी या सैनिकांना चांगला पगार देत असे. तोहि इतका नियमितपणे की दर शुद्धप्रतिपदेला ज्याला जे देण्याचं ठरलेलं असे त्याला ते मिळत असे.

शिवाजीच्या दक्षतेबद्दल कॉस्मा द गार्दा तपशीलवार माहिती अनेक ठिकाणी देतो. एका ठिकाणी त्याने लिहिले आहे, "सर्व रस्त्यावर त्याने विश्वासू हेर ठेवले होते. आणि पहारेकऱ्यांना त्याची अशी आज्ञा होती की कोणत्याहि घडीला कोणी भेटू इच्छील तर आपणाला कळवावे...तो अशा प्रत्येकाला भेटत व बोलत असे. आणि कोणी जर कांही महत्वाची बातमी आणली असेल तर त्याला तावडतोब बक्षीस तो देत असे...टपाल असेल तर ते रवाना झाल्याची तारीख व वेळ टिपून घेत असे आणि जलदीने आणणारांना बक्षीस देत असे... त्यामुळे प्रत्येकाला त्याची चाकरी करावीशी वाटे. (सदर, पृ. ४१)

ह्याच लेखक पुढे एका ठिकाणी लिहितो की, "शिवाजीवर त्याच्या लोकांचे अत्यंत प्रेम होते. पारितोषिक व शिक्षा दोहोंच्याहि बाबतीत तो इतका निःपक्षपाती असे की आयुष्यात त्याने कोणाहि व्यक्तीचा या बाबतीत अपवाद केला नाही. कोणत्याहि गुणाची कदर झाली नाही अथवा कोणत्याहि गुन्ह्याला शिक्षा झाली नाही असे कधी घडले नाही. हे सर्व तो इतक्या दक्षतेने करीत असे की त्याने याबाबतीत सर्व अधिकाऱ्यांना विशेष सूचना दिलेल्या होत्या..." सदर, पृ. ५०.

रात्रीच्या वेळी सैनिकांच्या छावण्यांची शिवाजी गुप्तपणे पाहणी करीत असे. अधिकाऱ्यांना हे माहीत असे की शिवाजीला प्रत्येक गोष्टीची माहिती असते. पण याउपरहि एखाद्याने जर अपराध केला तर शिक्षा होण्याला मुळीच वेळ लागत नसे. गार्दा लिहितो की हा वेळ फक्त गुन्ह्याचे ठिकाण व शिवाजीचे त्यावेळचे वास्तव्य यातील अंतरावरच अवलंबून असे. पृ० ५२

प्रजेच्या मनात शिवाजीराजाविषयी भय, आदर व प्रेम असल्याचे या परकीय लेखकांनी अनेक ठिकाणी लिहून ठेवले आहे.

शेवटी एका गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो. कॉस्मा द गार्दाने रामाजी नावाच्या एका ब्राह्मण सत्पुरूषाचा व त्याच्या आश्रमाचा विशेष उल्लेख केला आहे. या आश्रमात अथवा संस्थानात सर्वांना आश्रय मिळत असे, अन्न मिळत असे. सैनिकांनाहि या सत्पुरूषाविषयी अत्यंत आदर असे. कोणीहि

त्या संस्थानाला यत्किंचितहि उपद्रव पोचवीत नसे. सर्व जातीचे व सर्व धर्मांचे लोक येथे येत असत व आपला आदर व्यक्त करीत असत. (पृ. ६१). हे सत्पुरूष म्हणजे समर्थ रामदासच होत यात मला शंका वाटत नाही. शिवाजीच्या राज्यात प्राचीन काळच्या ऋषींच्या आश्रमाप्रमाणे हा आश्रम असलेला पाहून व त्याचे रक्षण होत असलेले पाहून या क्षत्रियोत्तम राजाबद्दलचा आदर दुणावल्याशिवाय राहात नाही. असो. अशा या,

> शिवरायाचे आठवावे रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप ।
> शिवरायाचा आठवावा साक्षेप । सर्व विषयीं ॥

[नागपूर आकाशवाणीच्या सौजन्याने]

'कापशीचे सत्पुरुष संत नानाजी महाराज आणि कविवर्य रे. टिळक'

श्री. आनंदराव जोशी यांचा अेक खुलासा

[उपरोक्त लेख 'युगवाणी'च्या मार्च–एप्रिल, १९६४ च्या अंकात प्रसिद्ध झाला आहे. त्या संबंधी नागपूरचे श्री. आनंदराव जोशी यांनी आमच्याकडे दि. १५ जून, १९६४ रोजी एक पत्र पाठविले. ते प्रसिद्धि साठी नव्हते. त्यांनी संपादक 'तरुण-भारत' यांच्याकडे १६ जून, ६४ ला एक पत्र प्रसिद्धिसाठी पाठविले. ते 'तरुण–भारता'कडून आमच्याकडे जुलै ६४ च्या मध्यावर आले. त्यासोबत कांही 'सूचना' नव्हती. म्हणून ते आतापर्यंत पडून राहिले. तथापि आता त्यातील आवश्यक तो भाग आम्ही येथे प्रसिद्ध करीत आहोत—संपादक]

'प्रस्तुत लेखाच्या आरंभी श्री. अ. दे. टिळक यांचे ता. १ मार्च १९६४ चे पत्र देण्यात आले आहे. त्यात ते लिहितात—"हिंगणघाटचे श्री. वखरे यांनी 'तरुण–भारतात' लिहिल्यापासून या विषयाकडे संत नानाजींच्या भक्तांचे व रे. टिळकांच्या कांही रसज्ञ चाहत्यांचे लक्ष लागलेले दिसते" संपादकीय टीपेतहि श्री. वखरे यांच्या लेखाचा पुनरुच्चार करण्यात आला आहे.

वाचकांच्या माहिती करिता श्री. वखरे यांच्या लेखा बाबतचा खरा प्रकार पुनः एकवार स्पष्टपणे सांगणे अवश्य वाटते. वरील ८ पदांपैकी पहिली दोन पदे मी तीस वर्षांपूर्वी 'महाराष्ट्राच्या ता. २ सप्टेंबर १९३४ च्या अंकात आनुषंगिक माहितीसह प्रसिद्ध केली होती. या लेखाचे कात्रण मी त्यावेळी श्री. देवदत्त नारायण टिळक यांच्याकडे पाठविले होते. पुढे ही दोन पदे त्यांच्या मातोश्री श्रीमती लक्ष्मीबाई टिळक यांनी लिहिलेल्या 'स्मृतिचित्रांत (भाग–१) समाविष्टहि करण्यात आली.'

अनुक्रमणिका

परिचय–परामर्श

समग्र केशवसुत

[संपादक–प्रा. भ. श्री. पंडित; प्रकाशक, व्हीनस प्रकाशन, पुणे; पृष्ठसंख्या ४००, मूल्य १५ रु.]

केशवसुतांच्या हयातीत त्यांच्या कवितेला संपादक व प्रकाशक लाभला नव्हता. पण १९१७ मध्ये एकदा हरिभाऊ आपटे यांनी केशवसुतांच्या कविता संग्रहित करून प्रकाशित केल्या नंतर गेल्या अर्धशतकात त्या कवितांना अनेक मान्यवर संपादक व मातवर प्रकाशक लाभले ही समाधानाची गोष्ट आहे. मात्र **'समग्र केशवसुत'** या ग्रंथाचे स्वरूप वेगळे व आगळे आहे. एक तर केशवसुतांच्या **समग्र** कविता या ग्रंथात पहिल्यांदाच एकत्र प्रकाशित होत आहेत. दुसरे, या ग्रंथाला प्रा. भ. श्री. पंडित यांच्या सारखे रसिक, चिकित्सक व साक्षेपी संपादक लाभले आहेत. तिसरे, या ग्रंथाचे संपादन प्रा. पंडितांनी आपल्या नांवालौकिकाला साजेल व त्यात भर पडेल अशा चोख रीतीने केले आहे; आणि चौथे व्हीनस प्रकाशनाने ते सुबक व आकर्षक स्वरूपात वाचकांना उपलब्ध करून दिले आहे.

प्रस्तुत ग्रंथाच्या संपादनाची कांही वैशिष्टचे येथे उल्लेखिण्या सारखी आहेत. केशवसुतांच्या कवितांचे विषयवारीने वर्गीकरण करण्याची सर्वसामान्य प्रथा व पद्धति सोडून प्रा. पंडितांनी कवितांचा निर्मिति वा प्रकाशन काळ–क्रम आधाराला घेऊन त्यानुसार तीन कालखंड पाडले आहेत आणि छापतानाहि त्यानुसार विभाग करून प्रत्येक कालखंडातील कविता काळक्रमानेच त्या त्या विभागात छापल्या आहेत. त्यामुळे कवीच्या जीवनदृष्टीचा, काव्य–दृष्टीचा, कवित्वशक्तीचा व अभिव्यक्ति–सामर्थ्याचा कसकसा विकास होत गेला हे जाणून घेण्याची अभ्यासकांना सोय झाली आहे. आरंभाला केशवसुतांचे चरित्र वर्णना व केशवसुतांच्या कवितेचे सविस्तर पर्यालोचन संपादकांनी केलेले असून शेवटी सविस्तर टीपांची जोड करून दिली आहे. परिशिष्ट रूपाने केशवसुतांचे अप्रसिद्ध लेखन–ज्यात चार इंग्रजी कविता, एक मराठी कविता, चार इंग्रजी पत्रे व एक मराठी पत्र आहे–अभ्यासकांना उपलब्ध करून देण्यात आले असून केशवसुतांच्य मृत्युनंतर त्यांना उद्देशून लिहिलेल्या निरनिराळ्या कवींच्या पाच कविताहि छापल्या आहेत.

अनुक्रमणिका

प्रस्तुत ग्रंथ तयार करताना केशवसुतांचे विश्वसनीय चरित्र उपलब्ध करून द्यावे व त्यांच्या कवितेची पाठशुद्ध आवृत्ति तयार करावी असा दुहेरी हेतु संपादकांनी बाळगला होता. तो तडीस नेण्यासाठी त्यांनी त्यावेळच्या अनेक नियतकालिकांचे अंक काळजीपूर्वक तपासले, अनेक समकालीन कवींचा पत्रव्यवहार वा चरित्रे–आत्मचरित्रे पाहिली; केशवसुतांच्या कवितांचे हस्तलिखित बाड नजरे खालून घातले आणि केशवसुतांच्या कवितांचे अनेक संपादक व टीकाकार यांचे लिखाण परीक्षिले. म्हणूनच या कार्यात त्यांना चांगले यश प्राप्त झाले आहे. संपादकांच्या या साक्षेपाचे कोणीहि, अनुकरणीय व अभिनंदनीय म्हणून, स्वागतच करील.

केशवसुतांचे चरित्र सादर करताना प्रा. पंडितांनी अवलंबिलेली पद्धति मार्मिक व शैली मनोरम आहे. कवीचे चरित्र, त्याचे व्यक्तित्व, त्याचे सखेसोबती व त्याचा काळ या सर्वांचा त्याच्या काव्याशी अविभाज्य असा आंतरसंबंध असतो. हे लक्षात घेऊन, त्या धोरणानेच प्रा. पंडितांनी प्रस्तुत कवीचे चरित्र सांगितले आहे. म्हणून ते मार्मिक झाले आहे. ते सांगताना प्रसन्न, प्रवाही व प्रसादपूर्ण शैलीचा त्यांनी अवलंब केला आहे त्यामुळे ती मनोरम झाली आहे.

चरित्रा इतकेच, किंबहुना त्याहूनहि महत्वाचे असे 'केशवसुतांच्या कवितेचे पर्यालोचन' या ग्रंथात आहे. ते 'केशवसुतांचे व्यक्तित्व व त्यांचे युग' यांच्या अनुरोधाने प्रा. पंडितांनी केलेले असल्यामुळे मर्मग्राही व रहस्योद्‌घाटक झाले आहे.

प्रा. पंडित केशवसुतांना द्रष्टे कवि मानीत नाहीत तर **युगकवि** मानतात. युगकवि म्हणजे आपल्या युगाचा प्रतिनिधि अशी त्यांची कल्पना आहे. या दृष्टीने त्यांनी केशवसुतांसंबंधी लिहिले आहे, "त्यांच्या कवितेत त्यांचें मानसिक आंदोलन, त्यांचें स्वप्नमय जीवन, त्यांच्या युगाचें स्पंदन, त्यावेळच्या जनतेचें श्वसन व तिच्या संघटित जीवनाचें गर्जन आहे. त्यांच्या कवित्वांत त्यांच्या व्यक्तित्वाचे व सामुदायिक अस्तित्वाचे उभे व आडवे धागे विणलेले आहेत." (पृ. ९६) हे वर्णन कोणत्याहि युगकवीच्या कवितेला तंतोतंत लागू पडणारे आहे.

केशवसुतांच्या व त्यांच्या कवितेच्या संबंधात टीकाकारांनी कांही भडक विधाने रूढ केली आहेत व त्यांचा अभ्यासकांवर विपरीत परिणाम होत आला आहे. 'केशवसुतांनी क्रान्ति केली', 'ते मूर्तिभंजक होते', 'त्यांचा संप्रदाय होता' वगैरे विधाने याच मासल्याची होत. प्रा. पंडितांचा या बाबतीतील दृष्टिकोन समंजस, उदार व वास्तविक आहे हे त्यांच्या 'पर्यालोचना वरून ध्यानात येते.

या पर्यालोचनातून प्रा. पंडितांच्या रसिकतेचा, चिकित्सकतेचा, शोधकतेचा व विवेचकतेचा चांगला प्रत्यय येतो. त्यामुळे केशवसुतांच्या कवितेचे 'यथा–तथ्य'

दर्शन घडण्याला व काव्याच्या अभ्यासाची योग्य दृष्टि प्राप्त होण्याला हे 'पर्यालोचन' अत्यंत उपकारक झाले आहे.

केशवसुतांच्या समग्र कवितेचे सम्यक् अवलोकन करण्याला हे पर्यालोचन जसे उपकारक आहे तसेच त्यांच्या प्रत्येक कवितेचे रसग्रहण करण्याला सविस्तर टीपांचे चांगले सहाय होण्यासारखे आहे.

कवितेत 'पाठभेद' तसे पर्यालोचनात 'मतभेद' हे, कांही प्रमाणात तरी, अपरिहार्यच होत. माझे असे मतभेद थोडे आहेत व फार महत्वाचे नाहीत. शिवाय ते मतभेद म्हणजे मूळ पर्यालोचनातील उणीवा नव्हेत. म्हणून त्यांचा येथे उल्लेख करण्याचे कांहीच प्रयोजन नाही.

ही आवृत्ति संशोधनपूर्वक व चिकित्सकपणे काढलेली असल्याने एक–दोन एरव्ही गौण वाटणाऱ्या उणीवा/दोषांचा उल्लेख करावासा वाटतो. शेवटी सविस्तर अशुद्धिशोधन केलेले असूनहि कांही महत्वाच्या 'अशुद्धि' राहून गेल्या आहेत. उदा. पृ. १३ खालून ओळ तिसरी यात 'प्रत्यक्ष'च्या जागी 'प्रत्येक' असावे असे वाटते. पृ. ७७ वर 'वातचक्र' कवितेतील उतारा दिला आहे. त्यात 'नरें मिळविले' असे छापले आहे ते 'नरें मळविलें' असे पाहिजे होते. पृ. ४० वर प्रा. पंडितांनी लिहिले आहे, "रहाळकर म्हणतात की त्यांच्या [केशवसुतांच्या] तोंडवळ्याची कल्पना त्यांचे वंधु सी. के. दामले यांच्या चेहेरेपट्टीवरून होण्यासारखी आहे. परंतु सी. के. दामले यांचा फोटो आणि सुंदररावांनी काढलेलें केशवसुतांचें चित्र यांच्यात तिळमात्रहि साम्य आढळत नाही असे मोठ्या कष्टाने म्हणावें लागतें." पण खेदाची गोष्ट अशी की याहि ग्रंथाच्या आरंभी सुंदररावांनी (सुंदर भास्कर वैद्य) काढलेले 'ते' चित्र छापले आहे. मात्र या खेदकारक गोष्टीचे कारकत्व प्रकाशकांचे आहे. प्रस्तुत ग्रंथाला विषयसूचीची जोड योग्य ठरली असती. तसेच अभ्यसनीय टीकाग्रंथांची व टीकालेखांची यादी अभ्यासाला उपकारक झाली असती. असो.

'समग्र केशवसुत' अभ्यासकांना अशा चिकित्सक व साक्षेपी दृष्टीने आणि सुंदर व सुबक रूपात उपलब्ध करून दिल्यावद्दल संपादक व प्रकाशक धन्यवादास पात्र आहेत.

—श्री. मा. कुलकर्णी

अनुक्रमणिका

कर्मवीर कन्नमवार

लेखक–तु. ना. काटकर, प्रकाशक–श्रीमती गोपिकाबाई कन्नमवार,
६८ बीचकँडी हाऊस, भुलाबाई देसाई रोड मुंबई २६
पृष्ठ संख्या डेमी १६८ किंमत रुपये पांच)

गेल्या जुलैत नागपुरास परत आल्यानंतर विदर्भ साहित्य संघात चंद्रपूरचे साहित्यिक श्रीयुत तु. ना. काटकर यांची योगायोगाने भेट झाली. त्यांनी आपले "कर्मवीर कन्नमवार" हे चरित्रवजा पुस्तक "सादर भेट" म्हणून देऊन "युगवाणी" मासिकात त्यावर आपला अभिप्राय व्यक्त करावा ही इच्छा प्रकट केली. नंतर युगवाणीचे संपादक प्रा. श्री. मा. कुलकर्णी यांनीही या गोष्टीस दुजोरा दिला. म्हणून या पुस्तका संबंधीचा प्रांजळ परिचय थोडक्यात करून देण्याचे योजिले आहे.

खुद्द चरित्रनायकाच्या पत्नीनेच म्हणजेच कर्तृत्ववान ताई कन्नमवारांनी या पुस्तकाचे जिव्हाळ्याने प्रकाशन केले आहे. अर्थातच पुस्तक दर्शनीय झाले आहे हे सांगावयाला नकोच. उंची कागद, सुबक मुद्रण, शोभिवंत छायाचित्रे इत्यादि सर्व आभरणांनी पुस्तक उठावदार झाले आहे यात शंका नाही.

पुस्तकाला आरंभी ताई कन्नमवारांचे हळुवार हृद्गत जोडले आहे. नंतर माननीय वसंतराव नाईक यांच्या "पुरस्कारा" ने शोभा आली आहे. तथापि यापुढची माननीय यशवंतराव चव्हाणांची "प्रस्तावना" हे या पुस्तकाला लाभलेले एक अपरूप लेणे आहे. त्यात ते म्हणतात "त्यांच्या बरोबर काम करण्याची मला ही जी संधि मिळाली ते मी खरोखरच माझे भाग्य समजतो. कारण सर्वार्थाने एक लोकनेता कसा वागतो, कसे काम करतो हे पाहण्याचा योग त्यामुळे मला आला. अतिशय शांतपणे, अबोलपणे आणि आपल्या कामाची थोडीसुद्धा जाहिरात न करता काम करण्याची कन्नमवारजींना जी विलक्षण हातोटी साधली होती ती खरोखर अनुकरणीय अशीच होती. . . . . मुंगी जसे साखरेचा एक एक कण गोळा करते तसे कन्नमवारजी अत्यंत गुणी व सेवाभावी माणसे गोळा करीत आणि अशा माणसांची एक मालिकाच जमविली होती. विदर्भामध्ये त्यांच्या बरोबर गेलो असताना हा अनुभव मला प्रकर्षाने आला. कार्यकर्त्या मंडळीचा गराडा त्यांच्याभोवती नेहमी पडलेला असायचा. तसेच ते लोकात अगदी मनमोकळेपणाने मिसळत असत. आणि लोकही त्यांच्यापाशी आपली सुखदुःखे हलकी करीत कारण लोकांच्या कल्याणाविषयी अंतःकरणांत अपार कळकळ होती. त्यांचे अश्रु पुसण्यास त्यांचा हात नेहमीच पुढे असे."

श्रीयुत तु. ना. काटकरांनी कन्नमवारजींच्या संबंधीची माहिती अत्यंत चिकाटीने आणि परिश्रमाने मिळविण्याकरिता स्वयंस्फूर्तीने तब्बल आठ वर्षे घालविली. हे त्यांनी मिळविलेले धन आणि संकलन त्यांनी या पुस्तकांतील अकरा प्रकरणातून विखुरलेले आहे. चंद्रपूरच्या परंपरेत, कष्टाळू जीवन, विविध दृष्टीतून व्यक्तिमत्व, काही संवयी, अविस्मरणीय आठवणी, कुशल पत्रकार, चढत्या प्रतिभेचे साहित्यकार, अनासक्त कर्मवीर, आपले मुख्यमंत्री, कुशल प्रशासक आणि जीवनज्योत मालवली हे प्रकरणांचे अकरा मथळे वाचूनच या चरित्रवजा पुस्तकाच्या धाटणीचे स्वरूप चाणाक्ष वाचकांच्या लक्षात येईल. या विखुरलेल्या आणि विस्कळित संभारातून कन्नमवारजींचे परिणामकारी एकसंघ व्यक्तिमत्व कितपत साकारले आहे हा प्रश्न शेवटी उरतोच. तथापि एका भावी उत्कृष्ट चरित्राचे साधन म्हणून या निरलस परिश्रमाचा उपयोग कधीकाळी झालाच तर होईल हे मात्र निश्चित !

पण हे चरित्र–लेखनाचे वैशिष्टच केवळ काटकरांचेच आहे असे मात्र नाही. मराठीतल्या अनेक चरित्र लेखनातून याच निर्जीव पद्धतीचा वापर केला जातो. म्हणूनच मराठीतील चरित्रलेखन हा अजूनहि एक अपरिपक्व किंवा शापित प्रकार आहे की काय असे वाटू लागते.

"Paint me as I am" वगैरे कलात्मक पण प्रामाणिक चरित्रलेखनाचे अद्यतन नि आदर्श तंत्र या असल्या चरित्रात अपेक्षिता येत नाही. कारण बहुधा थोरामोठ्यांची चरित्रे चरित्रनायकाच्या संबंधितांच्या आश्रयावरच अवलंबून असतात. तथापि अशाहि अडचणीत दादासाहेबांच्या बऱ्यावाईट सर्व प्रवृत्तींचे दर्शन श्रीयुत काटकरांनी प्रांजळपणे घडवले आहे म्हणून ते अभिनंदनास पात्र आहेत. विदर्भातील एका महत्पदावर चढलेल्या लोकनेत्याचे निरलस चरित्रकार म्हणून श्रीयुत काटकरांकडे महाराष्ट्र साहित्याचा भावी इतिहास अभिमानाने अंगुलिनिर्देश करील याविषयी मला शंका नाही.

—या. मु. पाठक

सारसंकलन—

लोकमान्यांची सत्यनिष्ठा

प्रा. श्रीधर भास्कर वर्णेकर यांचे व्याख्यान

[३० जुलै १९६४ गुरुवार रोजी विदर्भ साहित्य संघातर्फे भारतीय तिथीनुसार लोकमान्य टिळकांच्या जयंतीचा कार्यक्रम झाला. याप्रसंगी नागपूर विद्यापीठातील संस्कृतचे प्राध्यापक श्रीधर भास्कर वर्णेकर यांचे 'लोकमान्य टिळकांची

स्वत्वनिष्ठा' या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी संघाचे अध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे (कविवर्य अनिल) हे होते. श्री. वर्णेकर यांच्या व्याख्यानातील महत्वाचा भाग संकलित करून येथे देत आहोत. –संपादक]

"लोकमान्यांचा काळ हा राजकीय संघर्षाचा काळ असल्याने आणि त्या राजकीय संघर्षाचे धुरीणत्व लोकमान्यांनी सर्वस्वी आपल्या खांद्यावर धारण केल्याने सर्वसामान्य व्यक्तीला त्यांचे थोरपण त्यांच्या राजकीय कर्तृत्वातच प्रामुख्याने दिसणे स्वाभाविक आहे. तथापि त्या संघर्षमय परिस्थितीत त्यांनी समाजाची स्वत्वनिष्ठा टिकविण्याचा आणि जागविण्याचा जो प्रयत्न केला त्याला त्यांच्या राजकीय कार्या इतकेच महत्व आहे.

"टिळकांच्या काळात समाजसुधारणावादाच्या नांवाखाली स्वधर्मातील शास्त्रपूत विषयांची टवाळी करण्याची आत्मघातकी प्रवृति नवशिक्षित वर्गात वळावू लागली होती. राष्ट्राचा स्वत्वाभिमान रक्षिण्यासाठी लोकमान्य धार्मिकतेचा कैपक्ष घेऊन या तथाकथित सुधारणावाद्यांवर टीका करीत असत. "धर्माचा नायनाट करून सर्वसमाज धर्मशून्य वनल्यामुळे राष्ट्रैक्य किंवा राष्ट्रोन्नति झाल्याचे जगात एकहि उदाहरण नाही." "वाफेचे एंजिन चालण्यासाठी जशी वाफ ही मुख्य आहे. तसाच समाज सुव्यवस्थितपणाने चालण्यास धर्माच्या मूळ तत्त्वावरच मुख्यतः नजर दिली पाहिजे" इत्यादि त्यांच्या वचनांतून त्यांची धर्मपक्षपाती विचारप्रवृत्ति स्पष्ट दिसून येते. धर्मपराङ्मुख होऊ लागलेल्या समाजात, धर्मनिष्ठांचा पक्ष उचलून धरून धर्मश्रद्धा जागविण्याचा त्यांनी नेहमीच आटोकाट प्रयत्न केला.

"धर्माची बाजू युक्तिदृष्टचा कदाचित् लंगडी असेल पण जगातील सर्व व्यवहार कांही युक्तीनेच होत नाहीत. प्राचीन काळापासून चालत आलेली धर्मपरम्परा युक्तिपेक्षा शतपट प्रबळ असते." अशा स्पष्ट शब्दांत त्यांनी धर्मवादाचा पुरस्कार केला आहे. अशा प्रकारे लोकमान्य टिळक हे अन्तःकरणापासून धर्मनिष्ठ नव्हे धर्मपरम्परानिष्ठ असूनहि धडाडीने राजकारण करीत होते याचे कारण ते धर्म व राजकारण यात आपल्या कर्मयोगाच्या सिद्धान्तानुसार अभेद मानीत असत. **"धर्म व राजकारण दोन नाहीत."** हे त्यांचे वाक्य अत्यंत प्रसिद्ध आहे. धर्माच्या रक्षणासाठी ते राजकारणाच्या आघाडीवर आले होते असे, "आमची होमरूलची चळवळ ही हिंदुस्थानची परकीय जुलुमातून सोडवणूक करण्याकरिता आणि सनातन धर्म रक्षण करण्याकरिता आहे." "जुन्याकाळचे भगवद्भक्त आज देशभक्त झाले आहेत" इत्यादि त्यांच्या उद्‌गारावरून स्पष्ट दिसून येते.

लोकमान्यांच्या या धर्मनिष्ठेतूनहि त्यांच्या स्वत्वनिष्ठेचा स्पष्ट आविष्कार झाला आहे. त्यांची धर्मनिष्ठा मोघम स्वरूपाची नव्हती. धर्म म्हणजे स्वधर्म

अर्थात् हिंदुधर्म असाच भाव त्यांच्या धर्मनिष्ठत्वातून व्यक्त होतो. त्यांच्या काळी असे कित्येक धर्मवादी होते की जे स्वधर्माची म्हणजे हिंदुधर्माची निंदा करीत व परकीय ख्रिस्ती धर्माची प्रशंसा करीत किंवा त्याचा अंगीकार करीत. अशा लोकांच्या प्रचारामुळे व आचारामुळे सामान्य जनतेचा बुद्धिभेद होण्याची शक्यता असे. लोकमान्यांनी "आर्यधर्म किंवा वैदिक धर्म हा सर्वाहून प्राचीन आहे. इतकेच नव्हे तर मनुष्याच्या आत्म्यास कोणत्या उपायांनी मुक्ति मिळेल यावद्दलच्या विचारामध्येहि आर्यधर्मासच श्रेष्ठपणा द्यावा लागतो." "यूरोपखंडांत धर्म आणि तत्त्वज्ञान यांची तोडातोड झाल्यामुळे एक पोकळ व दुसरे अकिंचित्कर झालें आहे. तसा प्रकार हिंदुधर्मासंबंधाने नाही." "निव्वळ धर्मतत्वांचे इतर असारभूत गोष्टीपासून पृथक्करण करून सदर तत्त्वांचा केवळ सत्य दृष्टीने ज्यांत विचार केला आहे असा आर्यधर्माखेरीज इतर धर्म क्वचित्च आढळेल" इत्यादि वाक्यातून हिंदुधर्माची सर्वधर्माहून श्रेष्ठता प्रतिपादन करण्यात आपली स्वत्वनिष्ठा त्यांनी उत्कृष्ट प्रकारे व्यक्त केली आहे.

लोकमान्यांना व्यापक दृष्टि नव्हती किंवा विश्वबंधुत्ववाद त्यांना कळलाच नव्हता म्हणून ते स्वत्वनिष्ठ झाले होते असे नाही. कोणत्याहि इतर धर्ममताचा विरोध करण्याच्या भूमिकेवरून ते स्वत्वनिष्ठ बनले नव्हते. आत्मौपम्य आणि निर्वैरभावाचे प्रतिपादन करणाऱ्या भगवद्गीतेचे त्यांनी प्रदीर्घ आणि गहन अध्ययन केले होते. त्यामुळे त्यांच्यावर संकुचितत्वाचा, प्रतिगामीपणाचा किंवा प्रतिक्रिया-वादित्वाचा आरोप करणे अयोग्य होईल. स्वदेशाचा उद्धार हेच त्यांचे जीवित-कार्य होते, ते कार्य स्वत्वनिष्ठाशून्य विश्वबंधुत्ववादाने होईल यावर त्यांचा विश्वासच नव्हता. ते स्पष्ट म्हणतात, की "विश्वकुटुम्बित्वाची कल्पना दिसावयास फार मोहक आहे खरी. परंतु केवळ अशा कल्पनेच्या पायावर रचलेली राष्ट्रीयत्वाची इमारत शिखरास पोहोचल्याचें जगाचे इतिहासात कोणीतरी पाहिलें किंवा ऐकलें आहे काय?" "सर्व जग सुधारण्यास निघणाऱ्या रासेलस सारख्या भ्रांतिष्ट तत्त्ववेत्याचें हातून किंवा सर्वजगांतील दुःखे निवारण करण्यास निघालेल्या डॉन क्विक्झोटासारख्या विक्षिप्त वीराचें हातून कोणाचेंच खरें काडीभरहि कल्याण होणार नाही." अशा प्रकारे भ्रांतिष्ट ध्येयवादाच्या आहारीं न जाता रोकडचा व्यावहारिक वस्तुनिष्ठ भूमिकेवरून मानवाचे कल्याण करण्याची भूमिका असल्याने लोकमान्य टिळक हे स्वधर्म, स्वसंस्कृति व स्वराष्ट्रनिष्ठ झाले होते व त्यांतच त्यांचे मोठेपण समावले होते."

विदर्भ साहित्य संघ, नागपूर.

इ. स. १९६३–६४ चे वार्षिक कार्यवृत्त

१. प्रास्ताविक–

घटनेप्रमाणे विदर्भ साहित्य संघाचे नवीन वर्ष १ एप्रिल १९६३ पासून सुरू झाले. यावर्षामध्ये कार्यकारी मंडळाच्या चार सभा झाल्या आणि एक सर्वसाधारण सभा झाली.

२. सभासद–

चालू वर्षी विदर्भ साहित्य संघाचे एकूण ७६४ सभासद होते. त्यात एकूण २३५ आजीव सभासद असून ४ उपकर्ते, ६ आश्रयदाते, २ सहाय्यक आणि ५ हितचिंतक आहेत.

३. समित्यांचे कार्य–

विदर्भ साहित्य संघाचे कार्य प्रामुख्याने भिन्नभिन्न समित्यांच्या द्वारे चालते. चालू वर्षी निरनिराळया समित्यांनी पुढीलप्रमाणे अतिशय उत्साहाने कार्य केले.

१. सांस्कृतिक कार्यक्रम समिति–

(आमंत्रक–श्री. य. गो. मालोदे)

अ. श्रीगणेश व्याख्यानमाला–

दि. ६, ७ आणि ८ एप्रिलपर्यंत ह. भ. प. श्री. धुंडामहाराज देगलूरकर यांची "श्रीज्ञानेश्वरीच्या प्रथम अध्यायातील मंगलाचरणातील शब्दब्रह्मरूप श्रीगणेशाच्या रूपकांतील षड्दर्शने आणि त्यांचे स्वरूप"–ह्या विषयावर श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली तीन व्याख्याने झाली. दि. ८ रोजी रात्री वारकरी कीर्तन झाले.

आ. महाकवि कालिदास स्मृतिदिन–

दि. २२–६–६३ आषाढ शुद्ध प्रतिपदा–रोजी म. म. वाळशास्त्री हरदास आणि प्रा. डॉ. ग. मो. पाटील यांची भाषणे झाली.

इ. लो. टिळक जयंती–

लो. टिळक जयंतीनिमित्त दि. १२ जुलै रोजी श्री. दत्तोपंत ठेंगडी यांचे भाषण झाले.

अनुक्रमणिका

ई. कविवर्य ना. मु. गुप्ते ऊर्फ "बी" पुण्यतिथि–

विदर्भातील सुप्रसिद्ध कवि "बी" ह्यांची पुण्यतिथि दि. ३०–८–६३ रोजी साजरी करण्यात आली. यावेळी श्री. ना. रा. शेंडे आणि श्री. य. गो. मालोदे यांची भाषणे झाली. श्री. ज्ञा. रा. साधु यांनी स्वरचित कविता म्हणून दाखविली. प्रस्तुत कार्यक्रम नागपूर आकाशवाणीतर्फे ध्वनिमुद्रित करण्यात आला.

उ. श्रीशारदोत्सव–

श्रीशारदोत्सवानिमित्त दि. २५ सप्टेंबर रोजी प्रा. म. श्री. पंडित यांचे व्याख्यान झाले. यावेळी, अमेरिकेला जाऊन आलेले उदयोन्मुख कलाकार श्री. जगदीश टेकाडे यांचे सतारवादन आणि श्री. प्रभाकर पिल्ले यांचे तबलावादन झाले.

ऊ. स्वातंत्र्यवीर बॅ. वि. दा. सावरकर यांचा अमृतमहोत्सव–

ह्यामहोत्सवानिमित्त दि. २६ सप्टेंबर रोजी म. म. वाळशास्त्री हरदास याचे अध्यक्षतेखाली "सावरकर साहित्य" ह्या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. यावेळी प्रा. श्री. भा. वर्णेकर, प्रा. श्री. मा. कुलकर्णी, श्री. आ. रा. देशपांडे (कवि अनिल) यांची भाषणे झाली.

दि. २९ रोजी श्री. देवज्योति बर्मन–संपादक 'साप्ताहिक युगवाणी' कलकत्ता, यांचे भाषण झाले.

ए. हेमंत व्याख्यामाला–

दि. ४ ते १० नोव्हेंबर ६३ पर्यंत म. म. वाळशास्त्री हरदास ह्यांची "महाकवि कालिदास" ह्या विषयावर श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली सात उद्‌बोधक व्याख्याने झाली.

ऐ. इतर व्याख्याने

दि. ३–९–६३ रोजी प्रा. डॉ. गो. मा. कुलकर्णी यांचे 'अमेरिकेतील माझे काही अनुभव' ह्या विषयावर व्याख्यान झाले.

श्री ज्ञानेश्वरी पुण्यतिथि–निमित्त दि. १३–११–६३ रोजी ह. भ. प. निजामपूरकर महाराज यांचे 'ज्ञानेश्वरी' वर प्रवचन झाले.

ओ. ४१ वा वर्धापनदिन–

वि. सा. संघाच्या ४१ व्या वर्धापनदिनानिमित्त दि. १४ जानेवारी ६४ रोजी सायंकाळी ६–३० वा. श्री. ना. रा. शेंडे यांच्या हस्ते सरस्वतीपूजन झाले. यावेळी 'आजचे मराठी साहित्य' ह्या विषयावर चर्चा झाली. या चर्चेत सर्वश्री

ना. रा. शेंडे, श्री. गो. काशीकर, माणिकराव वैतुले, शंकरराव कुलकर्णी, चाटी वकील, गोरे, जोशी, स. वि. लिमये, र. त्रि. कुलकर्णी, वा. के. अत्रे, वा. गो. चोरघडे, मधुकरराव देशमुख, वा. रा. पाठक आणि कु. ताराबाई प्रधान यांनी भाग घेतला.

यावेळी, रंजनकला मंदिराने, राज्य नाट्यमहोत्सवात सुयश प्राप्त केल्या-बद्दल वि. सा. संघातर्फे त्यांचे जाहीर अभिनंदन करण्यात आले.

शेवटी तिळगुळ वितरण करण्यात आला.

औ. कादंबरीकार हरि नारायण आपटे जन्मशताब्दि–

कादंबरीकार आणि अष्टपैलू लेखक कै. ह. ना. आपटे यांची जन्मशताब्दि श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली दि. ८ मार्च ६४ रोजी साजरी करण्यात आली. यावेळी कै. आपटे यांच्या कादंबरीवाङ्मयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. या परिसंवादात प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते, प्रा. श्री. मा. कुलकर्णी आणि प्रा. भा. श्री. परांजपे यांनी भाग घेतला.

दि. १० मार्च रोजी कै. आपटे यांचेवर तयार करण्यात आलेला लघुचित्रपट शासकीय माहिती केंद्राच्या सौजन्याने, गडकरी सभागृहात दाखविण्यात आला.

२. नाट्य समिति–

(आमंत्रक–सौ. सुमतीबाई धनवटे)
(सह आमंत्रक–श्री. शंकरराव कुळकर्णी)

अ. दि. २ जून ६३ रोजी नाटककार कै. श्री. कृ. कोल्हटकर पुण्यतिथि-निमित्त श्री. वा. वा. भोळे यांचे भाषण झाले.

आ. दि. ३ जून रोजी वीर वामनराव जोशी यांची पुण्यतिथि साजरी करण्यात आली.

इ. कै. कृ. प्र. खाडिलकर पुण्यतिथीनिमित्त दि. २६ ऑगस्ट रोजी 'भाऊबंदकी' नाटकावर श्री. वा. वा. भोळे यांचे भाषण झाले.

ई. नाट्यशिक्षण शिबिर–

नाट्यसमितीच्या वतीने आणि महाराष्ट्र नाट्यविद्यालयाच्या सहकार्याने नागपूर येथे दि. ५ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर पर्यंत नाट्यशिक्षण शिबिर चाल-विण्यात आले. ह्या शिबिराचे संचालन सुप्रसिद्ध नाट्यशिक्षक श्री. प्रभाकरराव गुप्ते यांनी केले. साहाय्यक शिक्षक म्हणून श्री. राजाभाऊ पाठक, श्री. गणेश सोळंकी आणि कु. नलिनी शर्मा यांचे साहाय्य झाले. श्री. वा. वा. भोळे, डॉ. ग' त्र्यं. देशपांडे, श्री. ईश्वर देशमुख, डॉ. वि. भि. कोलते, प्रा. श्री. ना. बनहट्टी

अनुक्रमणिका

श्री. मोरुदादा कोठीवान यांनी वेळोवेळी नाटयवाङ्मय व नाटयतंत्राविषयी व्याख्याने दिली. तसेच श्री. शंकरराव पोपटकर यांनी तवला वादनाचा कार्यक्रम सादर केला.

ह्या नाटयशिक्षण शिबिराचे उद्‌घाटन दि. ४ ऑगस्ट रोजी महापौर श्री. त्रि. गो. देशमुख यांच्या हस्ते झाले. यावेळी श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे प्रमुख भाषण झाले. ह्याशिबिरात १०० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. दि. ३० ऑगस्ट रोजी समाजकल्याण मंत्री श्रीमती निर्मलाराजे भोसले यांनी शिबिराला भेट दिली.

दि. २०–९–६३ रोजी शिबिराचा समारोप-समारंभ करण्यात आला. यावेळी संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे यांनी अध्यक्षस्थान मंडित केले. श्री. ग. त्र्यं माडखोलकर, सौ. विमलाबाई देशपांडे यांची भाषणे झाल्यावर विद्यार्थ्यांतर्फे श्री. कमलाकर लाखकर, श्री. दत्ता हिवाळे यांनी भाषणे देऊन शिबिरात काय काय शिकलो ह्याची माहिती दिली.

ई. स्वातंत्र्यदिनानिमित्त दि. १४ ऑगस्ट रोजी धनवटे रंगमंदिरात समर-समरगीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

उ. दि. १३–७–६३ रोजी नटवर्य मास्टर दत्ताराम यांचा सत्कार करण्यात येऊन 'संशयकल्लोळ' नाटकाच्या तालमीचा मुहूर्त करण्यात आला.

दि. २१–७–६३ रोजी नटसम्राट श्री. बालगंधर्व यांचा अमृतमहोत्सव साजरा करण्यात आला. सुरुवातीला नागपुरातील साहित्यिक श्री. शं. बा. शास्त्री ह्यांचे भाषण झाले. नंतर सर्वश्री सदाशिवराव फडणीस, वसंतराव अंधारे आणि मधुकरराव गुळवणी ह्यांनी नाटयपदाचे गायन केले.

ए. नाटयलेखन स्पर्धा–

नाटयसमितीने आयोजित केलेल्या नाटयलेखन स्पर्धेत एकूण ११ नाटके आली. त्या नाटकांचे परीक्षण कार्य करण्यात येऊन 'आधी लग्न कोंडाण्याचे' (शालेय नाटक) ले. श्री. भि. गो. खडसेन आणि 'अंतिम विजय भारताचा' ले. श्री. वा. रा. पाठक, ही दोन नाटकें उत्तेजनार्ह ठरविण्यात आली. ह्या नाटकांचे परीक्षणकार्य श्री. वि. रा. हंवर्डे आणि प्रा. रू. पां. पाजणकर यांनी केले.

ऐ. बाल नाटयप्रयोग–

नाटयसमितीच्या बालनाटय विभागातर्फे दि. ८ सप्टेंबर ६३ रोजी सकाळी ९ वा. धनवटे रंगमंदिरात श्री. मधुसूदन वेलणकर लिखित "आम्हीहि सीमेवर गेलो असतो" ह्या नाटकाचा प्रयोग करण्यात आला.

ओ. नाट्यवाचन–

दि. १५ सप्टेंबर रोजी श्री. वा. रा. पाठक यांनी 'अंतिम विजय भारताचा' ह्या नाटकाचे वाचन केले.

औ. खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धा–

यावर्षी खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धेत आयुर्विज्ञान महाविद्यालय, कृषि महाविद्यालय, इंजिनियरिंग कॉलेज, युनिव्हर्सिटी स्टुडंड युनियन आणि सीताबाई आर्टस् कॉलेज (अकोला) ह्या महाविद्यालयांनी भाग घेतला. यावर्षीची फिरती खोलकुटे ढाल नागपूरच्या इंजिनियरिंग कॉलेजने मिळविली असून त्यांनी सादर केलेल्या 'जावयाचे बंड' ह्या नाटकात उत्कृष्ट स्त्रीभूमिका केल्याबद्दल कु. रेखा खरे आणि श्री. नांदे यांनी पुरुषभूमिका चांगली केल्याबद्दल, ह्या दोघांना प्रथम क्रमांकाचे बक्षिस देण्यात आले.

अं. बालनाट्योत्सव–

दरवर्षीप्रमाणे यंदाहि दि. ९ फेब्रुवारी ६४ रोजी बालनाट्यस्पर्धा आयोजित करण्यात आली. या बालनाट्योत्सवात एकूण चार संस्थांनी भाग घेतला.

१. सोमलवार हायस्कूल नागपूर — "संगे गोपाळांचा मेळा"
२. ऑडिट ऑफिस रिफ्रिएशन नागपूर —"वयं मोठं खोटं"
३. सरस्वती कला निकेतन नागपूर — "आई मिळाली पण"
४. कुर्वेज न्यू मॉडेल हायस्कूल नागपूर — "संगीत सहल"

ह्या स्पर्धेत 'वयं मोठं खोटं' ह्या बालनाटिकेचा प्रथम क्रमांक आला. आणि दुसरा क्रमांक 'संगे गोपाळांचा मेळा' ह्या नाटिकेचा आला.

बालनाट्योत्सव आणि खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धेच्या पारितोषकाचा वितरण समारंभ डी. आय्. जी. ऑफ पोलिस श्री. बाळासाहेब बंबावाले ह्यांच्या हस्ते झाला. ह्यावेळी प्रथम क्रमांक आलेल्या नाटिकेच्या चमूला रु. ५० चे पारितोषिक आणि रंजन कला मंदिराने दिलेला फिरता रौप्यचषक देण्यात आला. वैयक्तिक अभिनयाबद्दल कुमार श्याम पांढरीपांडे याला रंजन कलामंदिराचा फिरता रौप्यचषक देण्यात आला. दुसऱ्या क्रमांकाचे रु. ३० चे पारितोषिक 'संगे गोपाळांचा मेळा' ह्या नाटिकेला देण्यात आले. तसेच उत्तेजनार्ह म्हणून 'संगीत सहल' ह्या नाटिकेला रु. २० चे पारितोषिक देण्यात आले.

'श्री खोलकुटे नाट्यढाल' ह्या समारंभाचे वेळी देण्यात येऊन वैयक्तिक पारितोषिक वितरण करण्यात आले.

अ. नाट्यसमितीतर्फे श्री. शंभू मित्रा यांच्या बहुरूपी संस्थेचे (कलकत्ता) 'पुतुलखेला' हे बंगाली नाटक दि. २० फेब्रुवारी ६४ रोजी सादर करण्यात आले.

अनुक्रमणिका

३. न्या. मू. रानडे आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा आणि श्री. वि. स. खांडेकर पारितोषिक समिति

(आमंत्रक—श्री. मधुकरराव देशमुख)

अ. दि. १७ ते १९ सप्टेंबर ६३ पर्यंत वि. सा: संघाच्या धनवटे रंग-मंदिरात कै. न्या. मू. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा आयोजित करण्यात आली.

"आजची तरुण पिढी समाजाच्या अपेक्षा पुऱ्या करण्यास समर्थ आहे",— हा प्रस्ताव चर्चेसाठी ठेवण्यात आला होता. या वादस्पर्धेत विदर्भातील १९ महा-विद्यालयांनी भाग घेतला.

वादस्पर्धेचे उद्घाटन दि. १७ रोजी उपशिक्षण संचालक श्री. टी. ए. आपटे यांच्या हस्ते झाले. दि. १८ रोजी संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे हे अध्यक्षस्थानी होते. दि. १९ रोजी नागपूर इम्प्रुव्हमेंट ट्रस्टचे अध्यक्ष श्री. गो. गो. देसाई यांच्या हस्ते वक्षीस वितरण समारंभ पार पडला.

यावर्षी पुसद येथील फुलसिंग नाईक महाविद्यालयाला फिरती रौप्य ढाल मिळाली. कु. पुष्पा मोहिते, विदर्भ महाविद्यालय अमरावती यांना रु. १०० चे प्रथम क्रमांकाचे वैयक्तिक पारितोषिक मिळाले आणि ६० टक्यापेक्षा अधिक गुण मिळाल्यावद्दल प्रमाणपत्र देण्यात आले. कु. उपा घाटे नागपूर महाविद्यालय आणि श्री. एम्. वी. पवार, फुलसिंग नाईक महाविद्यालय पुसद या दोघांना सारखे गुण मिळाल्यामुळे दुसऱ्या क्रमांकाचे रु. ७५ चे पारितोषिक विभागून देण्यात आले.

या वादस्पर्धेचे वेळी तीनहि दिवस परीक्षक म्हणून श्री. वि. ल. उळाभाजे, अॅड. श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी आणि श्री. मा. नी. गलगलीकर यांनी सहकार्य दिले.

आ. श्री. वि. स. खांडेकर पारितोषिक—

श्री. वि. स. खांडेकर सत्कार समिति पुणे ह्या संस्थेने रु. ८००१ चा निधि वि. सा. संघाचे स्वाधीन केला असून ह्या रकमेच्या व्याजातून महाराष्ट्रातील नागपूर, मुंबई, पुणे आणि मराठवाडा विद्यापीठांतून वी. ए. परीक्षेत मराठी ऐच्छिक विषयात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी प्रत्येकी रु. १०० ची रोख पारितोषिके देण्यात येतात. त्यानुसार मार्च–एप्रिल ६३ मध्ये झालेल्या वी. ए. मराठी ऐच्छिक विषयात प्रथम येणाऱ्या पुढील विद्यार्थ्यांना पारितोषिक जाहीर करण्यात आले.

१. नागपूर विद्यापीठ — कु. शालन अवधूत भुरे, जळगाव
२. मराठवाडा विद्यापीठ — श्री. बी. जी. कवठेकर, तुळजापूर
३. पुणे विद्यापीठ — श्री. नारायण सदाशिव फरांडे, सोलापूर
४. मुंबई विद्यीपीठ — कु. सुमन गोपाळ रानडे, मुंबई

४. गडकरी स्मारक समिति–

(आमंत्रक–श्री. र. वि. कुळकर्णी)

कवि आणि नाटककार कै. राम गणेश गडकरी यांचा ४५ वा स्मृतिदिन समारंभ दि. २२ जानेवारी ६४ रोजी सायं. ७ वा. साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून कादंबरीकार आणि नाटककार श्री. वसंतराव वरखेडकर यांचे दि. २२ आणि २३ रोजी 'गडकरी कालीन नाटयतंत्र व गडकरी' ह्या विषयावर भाषण झाले. हे भाषण पुस्तिकारूपाने प्रसिद्ध करण्यात आले आहे.

५. चित्रशाळा समिति

(आमंत्रक–श्री मधुकर पारळकर)

चित्रशाला समितीकरिता, नागपुरातील तरुण चित्रकार श्री. मुकुंदराव पारळकर यांनी कै. खंडेराव सखाराम उर्फ दादासाहेब पारळकर यांच्या स्मृति-प्रित्यर्थ लो. बाळ गंगाधर टिळक यांचे छायाचित्र भेट म्हणून दिले.

छायाचित्राचा अनावरण समारंभ दि. १ ऑगस्ट ६३ रोजी श्री. ना. रा. शेंडे यांच्या हस्ते करण्यात आला.

६. ग्रंथालय समिति–

(आमंत्रक–श्री. गो. स. देहाडराय)

ग्रंथालय समितीच्या वतीने श्रीशिवाजी ग्रंथालय बांधकाम सुरू असून पुढीलवर्षी संदर्भ ग्रंथालय म्हणून श्रीशिवाजी ग्रंथालयाचा सर्वांना उपयोग होण्याची शक्यता आहे. इ. स. ६३–६४ पर्यंत ८६३७९ रु. चे बांधकाम झाले असून रु. ५०००० चे काम पुढील वर्षात होईल. बांधकामासाठी आतापर्यंत सीमेंट, लोखंड, विटा आदि खर्चाकरिता ४३१३५ रुपये खर्च आला. इ. स. ६४–६५ पर्यंत ग्रंथालयाचे बांधकाम पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे.

ग्रंथालयाच्या वाचनविभागासाठी–तरुण भारत (नागपूर–पुणे), महाराष्ट्र, नागपूर टाईम्स, गोमंतवाणी, केसरी, गावकरी, विवेक, साधना, लोकराज्य, धनुर्धारी, किर्लोस्कर, स्त्री, मनोहर, प्रतिष्ठान, म. सा. परिषदेचे मुखपत्र

अनुक्रमणिका

साहित्य पत्रिका, सत्यकथा, साहित्यसहकार, नवभारत, चित्रमयजगत्, पुरुषार्थ, सुषमा, उद्यम, मुलांचे मासिक, अमृत, गोकुळ, श्रीयुत, जीवनविकास, दीपलक्ष्मी, वीणा आदि वर्तमानपत्रें, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, त्रैमासिके भेट म्हणून येतात. विदर्भ साहित्य संघ या सर्व नियतकालिकांच्या चालकांचा अत्यंत आभारी आहे.

७. परीक्षा समिति–

(संपादक–प्रा. माणिक के. बेंतुले)

अ–मराठी भाषिकांना मराठी भाषेची ओळख करून देण्यापासून साहित्य-विषयात प्राविण्याच्या स्नातकोत्तर पदवीपर्यंत (मराठी प्रवेश ते साहित्य पारंगत–साहित्याचार्य प्रबंधपरीक्षेपर्यंत विविध परीक्षा वर्षातून दोनदा घेण्यात येतात. यावर्षी साहित्याचार्य प्रबंध परीक्षेसाठी पांच विद्यार्थ्यांचे प्रबंध–विषय मंजूर करण्यात आले असून त्यापैकी कु. नीलम माधव आठले बी. ए., सा. पारंगत, रा. भा. रत्न यांचा "मराठी नाटकातील स्त्रीजीवनाचे दर्शन इ. स. १८८० ते १९४०" हा प्रबंध मान्य होऊन त्यांना 'साहित्याचार्य' ही पदवी देण्यात आल्याचे घोषित करण्यात आले. पुढील वर्षापासून 'साहित्यप्रबोध' नावाची नवीन प्री–युनिव्हर्सिटी समकक्ष परीक्षा सुरू करण्याचा निर्णय परीक्षा समितीने घेतला आहे.

यावर्षी पुढीलप्रमाणे परीक्षार्थी परीक्षेस बसले—

परीक्षा	ऑगस्ट–६३	केंद्र संख्या ३३	जानेवारी ६४	केंद्र संख्या ३४
१. प्रवेश	१७८		२०९	
२. प्रारंभ	१७८		२०४	
३. विनीत	२८९		४५२	
४. परिचित	७८		२२१	
५. स्नातक	६९		१२०	
६. पारंगत	५		६	
विद्यार्थी	७८८		विद्यार्थी १२१२	

ऑगस्ट आणि जानेवारी ह्या दोन्हीहि सत्राकरिता केंद्राधिकारी, प्राश्निक आणि परीक्षक यांनी जे सहकार्य दिले त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

४. रंगमंदिर समिति

चिटणीस–श्री बाळासाहेब ढवळे
सहचिटणीस–श्री बाबुराव चिमोटे

वि. सा. संघ धनवटे रंगमंदिरात या वर्षी ५९ मराठी नाटकें, २० हिंदी नाटकें, ८ इतर भाषेतील नाटकें, ५० संगीत नृत्यादि कार्यक्रम, १७ जादूचे प्रयोग आणि ७ सभा–संमेलने झाली.

भाड्यापोटी रंगमंदिराला रु ३४१६९ चे उत्पन्न झाले.

यावर्षी रंगमंदिर समितीने एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मुंबईतील सुप्रसिद्ध नाट्यसंस्था 'इंडियन नॅशनल थिएटर'ने 'प्रायोगिक रंगभूमि या सदराखाली बसविलेली 'जनावर', ही एकांकिका रंगमंदिरसमितीच्या वतीने निमंत्रित नाट्यरसिकांना दाखविण्यात आली.

५. पुण्यतिथि–स्मृतिदिन आदि कार्यक्रम–

१. कै. अ. ब. कोल्हटकर यांच्या छायाचित्राचे अनावरण–

सदेशकार कै. अ. ब. कोल्हटकर यांची पुण्यतिथि दि. १५–६–६३ रोजी साजरी करण्यात आली, यावेळी मुंबईचे, समतानंद श्री. अ. ह. गद्रे यांनी दिलेल्या कै. कोल्हटकर यांच्या छायाचित्राचे अनावरण लो. ना. डॉ. बापूजी अणे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी न्या. मू. डॉ. भवानीशंकर नियोगी होते. डॉ. वि. भि. कोलते यांचे कै. कोल्हटकरांच्या वाङ्मयीन कार्याविषयी व्याख्यान झाले.

२. कै. कविवर्य अण्णाजी बोवडे यांचा २९ वा स्मृतिदिन–

कै. कविवर्य श्री. रा. उपाख्य अण्णाजी बोवडे यांचा २९ वा स्मृतिदिन समारंभ दि. १ ऑक्टोबर ६३ रोजी साजरा करण्यात आला. यावेळी महापौर श्री. त्रि. गो. देशमुख यांचे भाषण झाले. ह्यावेळी कविवर्य श्री. आनंदराव टेकाडे यांनी कै. बोबडे यांची "हरहर महादेव बोला" ही कविता म्हणून दाखविली.

३. कै. कुसुमावतिबाई देशपांडे स्मृतिदिन–

कै. कुसुमावतीबाई देशपांडे यांचा दुसरा स्मृतिदिनसमारंभ दि. १७-११-६३ रोजी साजरा करण्यात आला. यावेळी श्री. ना. रा. शेंडे, प्रा. भ. श्री. पंडित, श्री. पी. डी. देशमुख, श्री. ज्ञा. रा साधु, प्रा. श्री. गो. काशीकर, श्री. र. वि कुळकर्णी यांची भाषणे झाली.

४. कै. ह. ना. नेने स्मृतिदिन–

कै. ह. ना. नेने यांची पुण्यतिथि दि. २१–११–६३ रोजी साजरी करण्यात आली.

६. मराठी वर्णोच्चार विकास—(ग्रंथप्रकाशन समिति)–

(आमंत्रक–डॉ. द. ह. अग्निहोत्री)

प्रा. डॉ. द. ह. अग्निहोत्री यांनी लिहिलेल्या 'मराठी–वर्णोच्चार विकास' ह्या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ दि. ७ जून ६३ रोजी संरक्षणमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते पार पडला. अध्यक्षस्थान त्यावेळचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. मा. सा. कन्नमवार यांनी मंडित केले होते. या कार्यक्रमाचे वेळी श्री. ना. रा. शेंडे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, डॉ. वि. भि. कोलते आणि डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांची भाषणे झाली. प्रमुख ग्रंथाला महाराष्ट्र शासनातर्फे शास्त्रीय ग्रंथ म्हणून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले आहे.

७. भेटी आणि सत्कार समारंभ–

१. पद्मभूषण श्री. मामासाहेब वरेरकर यांचा सत्कार—

अ. पद्मभूषण श्री. भा. वि. ऊर्फ मामासाहेब वरेरकर यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त वि. सा. संघातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी न्या. मू. कोतवाल, कुलगुरु, नागपूर विद्यापीठ, यांचे उद्‌घाटनपर भाषण झाले. याप्रसंगी श्री. मामासाहेब वरेरकर यांच्या साहित्यसेवेच्या गौरवार्थ श्री. भय्यासाहेब घोटे सुवर्णपदकाचा निधि कुलगुरु नागपूर विद्यापीठ यांना अर्पण करण्यात आला. या सत्काराचे वेळी श्री. आ. रा. देशपांडे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, डॉ. वि. भि. कोलते, श्री. वा. वा. भोळे, श्री. द. रा. गोमकाळे, सौ. विमलाबाई देशपांडे यांची भाषणे झाली.

आ. श्री. वरेरकर सत्काराप्रीत्यर्थ नाटचमहोत्सव करण्यात आला.

दि. १४ रोजी रात्री ९ वाजता सहकारी संस्थेतर्फे 'हाच मुलाचा बाप' नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. प्रस्तुत नाटचप्रयोगाचे उद्‌घाटन श्री. त्रि. गो. देशमुख महापौर, यांच्या हस्ते झाले.

दि. १५–४–६४ रोजी प्रतिभा कला केंद्रातर्फे श्रीमंत नाटक सादर करण्यात आले.

दि. १६–४–६४ रोजी 'प्रेमा तुझा रंग कसा' नाटक नाटचसाधना ह्या संस्थेने सादर केले.

२. महाराष्ट्र विधान सभेचे सभापति आणि महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब भारदे यांनी दि. ५–५–६३ रोजी भेट दिली.

३. श्रीमती शारदादेवी मुखर्जी एम्. पी. यांनी दि. ५–७–६३ रोजी भेट दिली,

४. महाराष्ट्र चॅरिटी कमिशनर श्री. गोडसे, नागपूर विभागाचे असि चॅरिटी कमिशनर श्री. एस्. एम्. इस्माईल आणि श्री. डी. एम्. वकील डायरेक्टर ऑफ अकौंटंटस् यांनी दि. १ जुलै ६३ रोजी भेट दिली.

५. कल्याण पिक्चर्सचे मालक श्रीमंत जवाहरलालजी मुणोत यांना "सौतेला भाई" ह्या चित्रपटाच्या निर्मितीबद्दल दि. १९ जुलै रोजी, भारत शासनातील नभोवाणी आणि माहिती विभागाचे उपमंत्री श्री. श्यामनाथ यांचे उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

६. मेजर जनरल श्री. शंकरराव थोरात, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पब्लिक सर्व्हिस कमिशन मुंबई यांनी दि. २०–११–६३ रोजी भेट दिली.

७. मुख्यमंत्री मा. श्री. वसंतराव नाईक यांची भेट––

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी दि. २२–६–६३ रोजी भेट दिली. वि. सा. संघाचे कार्य पाहून मुख्यमंत्र्यानी समाधान व्यक्त केले. नंतर गडकरी स्मारक सभागृहात श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा सत्कार करण्यात आला.

८. सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. वि. ह. कुळकर्णी यांनी दि. २–१–५४ रोजी भेट दिली.

९. ख्यातनाम हिंदी साहित्यिक श्री. जैनेंद्रकुमार यांनी दि. ६–१–६४ भेट दिली.

१०. पाकिस्तानचे माजी कायदेमंत्री श्री. जोगेन्द्रनाथ मंडल यांनी दि. ११–१–६४ रोजी भेट दिली.

११. प्रा. रा. ब. माढेकर हैद्राबाद यांनी दि. २०–१–६४ रोजी भेट दिली.

१२. आचार्य विनोबाजी भावे यांची भेट––

आचार्य विनोबाजी भावे यांच्या नागपुरातील मुक्कामात त्यांचेशी नागपुरातील सर्वभाषी साहित्यिकांची भेट व चर्चा असा कार्यक्रम श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली दि. २९–३–६४ रोजी सकाळी १०–३० वा. धनवटे रंगमंदिरात आयोजित करण्यात आला. यावेळी आचार्य विनोबाजी भावे यांनी साहित्याचे स्वरूप आणि सामर्थ्य यासंबंधी भाषण दिले.

८. श्री. मा. सां. कन्नमवार यांच्या निधनानिमित्त शोकसभा–

दि. २६–११–६३ रोजी सायं. ६-३० वा. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. मा. सां. कन्नमवार यांच्या दुःखद निधनानिमित्त श्री. ग, त्र्यं. माडखोलकर

यांच्या अध्यक्षतेखाली दुखवटयाची सभा झाली. यावेळी प्रा. श्री. गो. काशीकर, श्री. गो. स. देहाडराय, श्री. ना. रा. शेंडे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांची भाषणे झाली. श्री. ज्ञा. रा. साधु यांनी कै. कन्नमवार यांच्या निधनानिमित्त केलेली कविता म्हणून दाखविली.

९. संलग्न संस्थावृत्त–

१. रंजन कलामंदिर

यावर्षी रंजनकलामंदिराने दि. २६ ऑगस्ट ६३ रोजी 'त्रिवेणीस्पर्धा' आयोजित केली. यावेळी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध भावगीतगायक श्री. गजानन वाटवे ह्यांच्या हस्ते विजेत्या चमूंना बक्षिसे देण्यात आली.

विजयादशमीनिमित्त डॉ. किंचित फ्राईड, 'नाटक बसते आहे' ह्या दोन नाटिकांचे प्रयोग करून दाखविण्यात आले.

श्री. पु. व्यं. दारव्हेकर लिखित 'वऱ्हाडी मानसं' ह्या नाटकाला प्रादेशिक नाटयस्पर्धेत तसेच महाराष्ट्र राज्य नाटयमहोत्सवात प्रथम क्रमांक मिळाला. श्री. राजा पाठक आणि श्री. गणेश सोळंकी यांना उत्कृष्ट अभिनयाबद्दल पारितोषिक देण्यात आले. तसेच उत्कृष्ट लेखनाबद्दल आणि दिग्दर्शनाबद्दल श्री. पु. व्यं. दारव्हेकर यांना अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांकाचे बक्षिस मिळाले.

२. भारतीय भाषाध्ययन मंदिर—(नागपूर)

भारतीय भाषाध्ययन मंदिर नागपूर ह्या संस्थेने वास्तू उभारण्यासाठी निधि मिळविला असून रेशिमबाग ले आऊट या ठिकाणी नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडून ०–३७ एकर जमीन मिळविली.

दि. २९–१०–६३ रोजी महानगरपालिकेचे शालानिरीक्षक यांनी संस्थेच्या आंतरभारती ग्रंथालयास भेट दिली.

संस्थेतर्फे आंतरभारती साहित्यपत्रिका काढण्यात आली असून, प्रमाणपत्र वितरण समारंभाच्या कार्यक्रमाचे वेळी दि. २१–७–६३ रोजी महापौर श्री. त्रि. गो. देशमुख यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

शाखा वृत्त

१. गोंदिया शाखा–

अध्यक्ष–श्री. भय्यासाहेब घोटे
सहचिटणीस–श्री. वा. न. पागे

अ. शाखेच्या विद्यमाने दि. २५–४–६३ रोजी श्रीशिवजंती साजरी करण्यात आली.

आ. f १६-४-६३ रोजी मुख्यमंत्री श्री. मा. सां. कन्नमवार यांनी भवभूती रंगमंदिराला भेट दिली.

इ. दि २७ जुलै रोजी कवि तुलसीदास जयंतीचा कार्यक्रम श्री. पद्मकांतजी ठाकूर, वकील यांच्या अध्यक्षतेखाली झाला. याप्रसंगी श्री. पन्नालालजी बिसेन यांचे व्याख्यान झाले.

ई. दि. १ ऑगस्ट रोजी लो. टिळक पुण्यतिथि साजरी करण्यात आली.

उ. दि. १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला.

ऊ. डॉ. ई. आशीर्वादम्, प्रमुख, राज्यशास्त्रविभाग, जबलपूर विद्यापीठ, यांनी दि. २५ ऑगस्ट रोजी शाखेला भेट दिली. यावेळी त्यांचे 'माझे अमेरिकेबाबत मत' ह्या विषयावर भाषण झाले.

२. गोंडवनशाखा–चंद्रपूर–

अध्यक्ष–श्री. भ. सो. खनके
सहचिटणीस–श्री. पु. ह. धनकर

१. वन्य जीवनाचे निरीक्षण करण्यासाठी महाराष्ट्रातील पत्रकार व साहित्यिक यांच्या तुकडीने दि. १२ फेब्रुवारी ६४ रोजी शाखेला भेट दिली. यावेळी बवांचे स्वागत करण्यात आले. यावेळी लोककवि श्री. मनमोहन, श्री. गो. प. शाह आणि श्री. अनिरुद्ध पुनर्वसू यांचे काव्यगायन झाले. सुप्रसिद्ध कथालेखक श्री. मधुमंगेश कर्णिक यांनी स्वागताला उत्तर देणारे भाषण केले.

३. पुसद शाखा–

अध्यक्ष–श्री. ज. व्यं. पल्लेवार
कार्यवाह–प्रा. प्र. ना. उर्ध्वरेषे

अ. दि. २६ एप्रिल रोजी आचार्य अत्रेकृत "पाणिग्रहण" नाटकाचा प्रयोग करण्यात आला.

आ. पुसद शाखेतर्फे वि. सा संघाचे २५ वे रौप्यमहोत्सवी साहित्य संमेलन घडवून आणण्याचे ठरले आहे.

४. अमरावती शाखा–

अध्यक्ष–प्राचार्य जी. एस्. वैद्य
सहचिटणीस–प्रा. भाऊ भालेराव

शाखेतर्फे दि. ८ मार्च रोजी भारतीय महाविद्यालयाच्या सभागृहात कै. हरिभाऊ आपटे जन्मशताब्दि साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष-

ध्यान प्रा. मा. ल. व्यवहारे यांनी स्वीकारले होते. यावेळी प्राचार्य श्री. अण्णा वैद्य, प्रा. भाऊ भालेराव आणि प्रा. बाळ कुळकर्णी यांनी हरिभाऊंच्या वाङ्मयावर भाषणे दिली.

५ वणी शाखा–

अध्यक्ष–डॉ. द. ह. अग्निहोत्री
सहचिटणीस–श्री. म. ता. राजूरकर

वि. सा. संघाच्या जानेवारी ६४ च्या सत्रात, वणी केंद्रातील विद्यार्थी श्री. नं. मु. गंगशेट्टीवार हा साहित्य–विनीत परीक्षेत प्रथम श्रेणीत सर्वप्रथम आल्यामुळे त्या विद्यार्थ्याचा आणि त्याच्या आई–वडिलांचा सत्कार, दि. १३ मार्च ६४ रोजी आदर्श हायस्कुलातील चालकांनी केला, यावेळी श्री. मु. ज. ठाकरे मुख्याध्यापक, केंद्राधिकारी श्री. म. ता. राजूरकर आणि वर्गशिक्षक श्री. मा. गं. सरपटवार यांची भाषणे झाली.

६. नांदुरा शाखा–

अध्यक्ष–श्री. एन्. टी. पाटील
चिटणीस–श्री. र. वि. बाळापुरे

अ. दि. २५–४–६३ रोजी सकाळी शिवजयंतीचा कार्यक्रम घेण्यात आला. ह्याप्रसंगी प्रा. भाऊ भालेराव यांचे 'इतिहासातील काही पाने' ह्या विषयावर भाषण झाले. दुपारी प्रा. मा. ल. व्यवहारे यांचे "राष्ट्रीय आस्मिता" या विषयावर व्याख्यान झाले.

आ. रात्री ९ वा. शेगावचे राष्ट्रीय कीर्तनकार ह. भ. प. श्री. काळे गुरुजी यांचे 'श्री शिवाजी आणि तुकोबाराय" या विषयावर कीर्तन झाले.

ह्याशिवाय यवतमाळ, काटोल, सावनेर, वाशीम, तळोधी, खामगाव, आर्वी, पुलगाव ह्याठिकाणीहि वि. सा. संघाच्या शाखा कार्य करीत असतात.

विदर्भ साहित्य संघाला अनुदान

१. विदर्भ साहित्य संघाला महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडून खालीलप्रमाणे अनुदान प्राप्त झाले–

(अ) वार्षिक अनुदान रु. ७५००/–

(ब) नाट्यसमिती करिता रु. १०००/–

२. नागपूर महानगर पालिकेकडून ६१–६२ आणि ६२–६३ चे एकूण रु. ४००/– अनुदान प्राप्त.

३. चॅरिटी कमिश्नर महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे शिफारसीने, ट्रस्टी– कस्तुरबाई सिंदिया कमिशन ट्रस्ट कडून रु. ५००/– ची देणगी मिळाली.

४. 'बहुरुपी' नाट्यसंस्था कलकत्ता यांनी वि. सा. संघाला रुपये २००/– ची देणगी दिली.

विदर्भ साहित्य संघ शासनाचे, महानगर पालिकेचे व इतर देणगीदारांचे अत्यंत आभारी आहे.

आभार–

यावर्षी वि. सा. संघाचे कार्य पार पाडण्यास अनेक कार्यकर्त्यांचे, दात्यांचे सभासदांचे आणि संस्थांचे सहाय्य झाले आहे. विदर्भ साहित्य संघ त्यांचा अत्यंत आभारी आहे.

आपले,

अ. रा. देशपांडे
अध्यक्ष

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस

य. गो. मालोदे

ना. रा. शेंडे
उपाध्यक्ष

गो. स. देहाडराय

तु. ना. काटकर
चिटणीस

दि. ११–७–१९६४
नागपूर

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ,

तपशील			जमा	
	रु.	पैसे	रु.	पैसे
आरंभीची शिल्लक				
दि बँक ऑफ महाराष्ट्र (करंट)	५,४८०	७१		
(बिल्डिंग फंड)	५०६	३८		
(नाट्य संमेलन)	३३	५५		
(श्री शिवाजी ग्रंथालय)	१६,२४२	६५		
विदर्भ प्री. को-ऑ. हाउसिंग सोसायटी	३,०९४	५१		
(प्रॉ. फंड)	९७०	७४		
मुदती ठेव	२१,५०१			
शिल्लक जवळ (वि. सा. संघ)	२१२	६४		
(रंग मंदिर)	८४२	३४		
		एकूण	४८,८८४	५२
साधारण सभासद वर्गणी			१,५८८	००
संलग्न संस्था			१५	००
आजीव सभासद वर्गणी			१००७	००
पुस्तक विक्री			५८६	८३
व्याज			३७२	८५
		पुढे चालू	५२,४५४	२०

अनुक्रमणिका

नागपूर, १९६३–६४

तपशील	खर्च	
	रु.	पैसे
कै. रानडे वाद स्पर्धा	२३८	११
श्री. खांडेकर सत्कार निधि	४०३	२०
वेतन खर्च	५,०८४	७४
दूरध्वनी	७४१	९२
डाक व्यय	२२१	४२
मुद्रण व लेखन सामुग्री	५४७	६३
युगवाणी मुद्रण	४,०३३	४०
वाहन व प्रवास खर्च	८५६	६०
किरकोळ खर्च	९४	२१
सांस्कृतिक कार्यक्रम समिति	१,३२४	३०
गडकरी स्मारक समिति	७३	१४
नाटय समिति व नाटय स्पर्धा	३,१२१	३१
आतिथ्य	२४५	९५
वीज खर्च	४७२	९९
परीक्षा समिति	४१६	९२
”	४,७७२	८०
अधिकोष वर्तन	१०	५५
वस्तु खरेदी	६५	००
ग्रंथसंपादन व प्रकाशन	१०७	९६
अंकेक्षण शुल्क	१००	००
शाखा अंशदान	१४७	५०
गडकरी ग्रंथालय व पुस्तक खरेदी	२०	१६
चित्र शाला	४	९७
मराठी साहित्य महामंडळ	२२४	८३
कर्मचाऱ्यांचा भविष्य निधीचा वि. सा. संघ हिस्सा	१३७	३३
पुढे चालू	२३,४६६	५४

अनुक्रमणिका

तपशील		जमा	
		रु.	पैसे
	मागील पानावरून	५२,४५४	२०
परीक्षा शुल्क		५,२७४	९९
सांस्कृतिक कार्यक्रम समिति		२,७८३	७१
देणग्या		९००	००
सरकारी अनुदान		७,५००	००
किरकोळ उत्पन्न		३६५	५३
उसनवार		१५३	११
नाटय समिति व नाटय स्पर्धा		३,४३२	००
युगवाणी वर्गणी		२६९	००
भविष्य निधि		२६७	५२
कै. रानडे वाद स्पर्धा		३३५	००
श्री खांडेकर सत्कार निधि		४००	०६
निलंबित खाते		२४२	९५
वीज खर्च वसुली		१४९	००
परीक्षा समिति		५४२	६८
कार्यालयीन व्यवस्था व शाखा साहाय्य		२४३	४७
	पुढे चालू	७५,३१३	२२

तपशील			खर्च	
	रु.	पैसे	रु.	पैसे
मागील पानावरून			२३,४६६	५४
श्री शिवाजी ग्रंथालय तात्पुरते कर्ज फेड			१२,११२	७९
वांधकाम			१९,७६५	६२
किरकोळ खर्च			४४	१७
,, कार्यालयीन खर्च			२९०	००
श्री घनवटे यांचे तात्पुरते कर्ज फेड (रंगमंदिर)			९,०००	००
वेतन खर्च			७,२४७	५०
दूरध्वनि व डाक व्यय			३१४	१०
विद्युत खर्च			५,२०९	७१
लेखन सामुग्री व मुद्रण			१३	५०
इमारतीचा विमा			५७८	१३
रंगमंदिर खर्च व वस्तू खरेदी			१,०६६	८८
व्याज–वि. सा. संघास दिले			३६०	००
नागपूर महानगरपालिका कर– मालमत्ता इ.			४,७८६	९४
अधिकोष वर्तन			१	२०
पुढे चालू			८४,२५७	०८
शिल्लक				
दि बँक ऑफ महाराष्ट्र (करंट)	४,७८७	२०		
(वि. फंड)	४,७८५	१७		
(नाट्य सम्मेलन)	४५	६३		
,, (श्री शिवाजी ग्रंथालय)	३६२	०३		
विदर्भ प्री-को–ऑ–हाउसिंग सोसायटी	१,८०७	१६		
(प्रॉ. फंड)	१,२३१	०५		
मुदती ठेव	२१,५०१	०० *		
पुढे चालू	३४,५१९	२४		

अनुक्रमणिका

तपशील	जमा	
	रु.	पैसे
मागील पानावरून	७५,३१३	२२
लोक साहित्य संपदा–सरकारी अनुदान	२,२५०	००
अग्रिम (कर्मचारी)	५०	००
नाटय सम्मेलन	११	२८
श्री वरेरकर सत्कार निधि	४३०	५४
श्री शिवाजी ग्रंथालय–देणग्या इत्यादि	१०,४६८	८७
–सुरक्षा स्थित निक्षेप (श्री. जोग)	५,८६३	०९
रंगमंदिर–उत्पन्न इत्यादि	३,४१६९	६२
एकूण	१,२८,५५६	६२

अनुक्रमणिका

तपशील			खर्च	
	रु.	पैसे	रु.	पैसे
मागील पानावरून	३४,५१९	२४	८४,२५७	०८
शिल्लक जवळ (धनादेश ७,५००/–)	७,६२५	०९		
(रु. धनादेश २०००/)	२,१५५	२१		
			४४,२९९	५४
* डॉ. शिंगणापूरकर पारितोषिक स्थित निक्षेप विदर्भ प्री.को-ऑ. हाउसिंग सोसायटी	५००	००		
	११,००१	००		
१२ वर्षे नॅशनल प्लॅन सेव्हिंग्ज सर्टिफिकेट	२०००	००		
श्री गणेश व्याख्यानमाला १० वर्षे ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिट सर्टिफिकेट	६०००	००		
विश्वस्तांच्या नावे "हिंदफिन"	२०००	००		
	२१,५०१	००	१,२८,५५६	६२

तपासले ते बरोबर आहेत.
महेश्वर जनार्दन पत्रे
चार्टर्ड अकौंटंटस्
११–७–६४

विदर्भ साहित्य

(१-४-१९६३ ते ३१-३-६४) ३१ मार्च १९६४ ला

तपशील	व्यय	
	रु.	पैसे
वेतन खर्च	५,०८४	७४
डाक व्यय	२२१	४२
दूर ध्वनि	७४१	९२
मुद्रण व लेखन सामुग्री	५४७	६३
युगवाणी मुद्रण	४,०३३	४०
वाहन व प्रवास खर्च	८५६	६०
किरकोळ खर्च	९४	२१
सांस्कृतिक कार्यक्रम समिति	१,३२४	३०
गडकरी स्मारक समिति	७३	१४
परीक्षा समिति	४,७७२	८०
"	४१६	९२
नाटय समिति व नाटय स्पर्धा	३,१२१	३१
आतिथ्य	२४५	५५
वीज खर्च	३२३	९९
अधिकोष वर्तन	१०	५५
अंकेक्षण शुल्क	१००	००
शाखा अंशदान	१४७	५०
चित्रशाला	४	९७
मराठी साहित्य महामंडळ	२२४	८३
कर्मचाऱ्यांचा भविष्य निधीचा वि. सा. संघ हिस्सा	१३७	३३
श्री शिवाजी ग्रंथालय किरकोळ खर्च	४४	१७
" कार्यालयीन खर्च	२९०	००
खर्चापेक्षा उत्पन्न जास्त	८६४	२७
	२३,६८१	५५

अनुक्रमणिका

संघ, नागपूर.

संपणाऱ्या आय–व्ययाचा तक्ता

तपशील	आय रु.	पैसे
साधारण सभासद वर्गणी	१,५८८	००
संलग्न संस्था	१५	००
परीक्षा शुल्क	५,२७४	९९
किरकोळ जमा	३६५	५३
सांस्कृतिक कार्यक्रम समिति	२,७८३	७१
नाटच समिति व नाटच स्पर्धा	३,४३२	००
पुस्तक विक्री	५८६	८३
ठेवीवरील व्याज	३७२	८५
युगवाणी वर्गणी	२६९	००
सरकारी अनुदान	७,५००	००
देणग्या	९००	००
नाटच संमेलन	११	२८
कै. रानडे वादस्पर्धा	९६	८९
ग्रंथ संपादन व प्रकाशन	२४२	००
कार्यालयीन व्यवस्था व शाखा साहाय्य	२४३	४७
	२३,६८१	५५

तपासले ते बरोबर आहेत.
महेश्वर जनार्दन गद्रे
चार्टर्ड अकौंटंटस्
११–७–६४

विदर्भ साहित्य

३१ मार्च १९६४ चे स्थिति

फंड व लायबिलिटिज

		रु.	पैसे	रु.	पैसे
मंदिर निधि	मागील	२,३१,५९७	२२	२,४६,१८८	८८
	यंदाचे	१४,५९१	६६		
सरकारी अनुदान	मागील			२,४१,९७३	००
स्थित निक्षेप	,,	९,०००	००		
परत फेड वजा—यंदाचे		९,०००	००	००	००
तात्पुरते कर्ज	मागील			२,७५९	५०
व्यापारी देणे				४७,८९९	६७
अंकेक्षण शुल्क				१००	००
आजीव सभासद	मागील	९,५८९	००		
	यंदाचे	१,००७	००	१०,५९६	००
कै. वेहेरे व्याख्यानमाला	मागील			६,०००	००
श्री. गणेश व्याख्यानमाला				६,०००	००
श्री. खांडेकर सत्कार निधि	,,	८,२०७	०९		
वजा	यंदाचे	३	१४	८,२०३	९५
श्री. वरेरकर सत्कार	मागील	१५५	१७		
	यंदाचे	४३०	५४	५८५	७१
श्री शिवाजी ग्रंथालय देणग्या इ.	मागील	२३,५५३	२५		
	यंदाचे	१०,४६८	८७	३४,०२२	१२
सरकारी अनुदान	मागील			३२,०००	००
तात्पुरते कर्ज	,,	१७,५६०	००		
परत फेड वजा	यंदाचे	८,६१२	७९	८,९४७	२१
अनामत	मागील	३,५००	००		
परत वजा	यंदाचे	३,५००	००		
		पुढे चालू		६,४५,२७६	०४

संघ, नागपूर.

विवरण (बॅलन्स शीट)

ॲसेस्ट व प्रॉपर्टीज

		रु.	पैसे	रु.	पैसे
मंदिर रचना	मागील			५,४६,६८१	३८
टिनशेड व विहीर				५,३४१	८६
इमारत बांधकामाचा अग्रिमा				५,३६०	९६
उपस्कर व इतर सामान	,,	११,८८५	७२		
	यंदाचे	६५	००	११,९५०	७२
पुस्तके (गडकरी ग्रंथालय)	मागील	२,०१८	९६		
	यंदाचे	२०	१६	२,०३९	१२
विद्युत व दूरध्वनि स्थित निक्षेप	मागील			२,०८१	००
कै. गडकरी तैलचित्र				३००	००
कर्मचारी अग्रिमा	,,	५०	००		
वजा	यंदाचे	५०	००	००	००
परीक्षा समिति हिशेब येणं	मागील	५४२	६८		
खर्च व रोख वजा	यंदाचे	५४२	६८	००	००
कै. नाना जोग स्मारक निधि	मागील			१,०७०	५५
श्री शिवाजी ग्रंथालय बांधकाम	,,	६६,६१३	४७		
	यंदाचे	१९,७६५	६२	८६,३७९	०९
मुदती ठेव				२१,५०१	००
शिल्लक:—जमा खर्चाच्या तक्त्यात दाखविल्याप्रमाणे				२२,७९८	५४
		पुढे चालू		७,०५,५०४	२२

अनुक्रमणिका

फंड व लायबिलिटिज

		रु.	पैसे	रु.	पैसे
मागील पानावरून				६,४५,२७६	०४
ठेकेदार स्थित निक्षेप	मागील	६,७५९	३१		
	यंदाचे	५,८६३	०९	१२,६२२	४०
ग्रंथ प्रकाशन अनुदान	मागील	८८९	८०		
मराठी वर्णोच्चार विकास वजा	यदाचे	३४९	९६	५३९	८४
ग्रंथ प्रकाशन अनुदान लोक साहित्य संपदा	यंदाचे			२,२५०	००
भविष्य निधि	मागील	९६३	५३		
	यंदाचे	२६७	५२	१,२३१	०५
कै. नेने स्मारक फंड	मागील			७५	००
डॉ. शिगणापूरकर पारितोषिक	,,			५००	००
निलंबित खाते जमा	यंदाचे	२४२	९५		
वजा	मागील	१९०	३२	५२	६३
उसनवार	यंदाचे			१५३	११
सामान्य निधि	मागील	४१,९३९	८८		
खर्चापेक्षा उत्पन्न जास्त	यंदाचे	८६४	२७	४२,८०४	१५
				७,०५,५०४	२२

ॲसेस्ट व प्रॉपर्टी

	रु.	पैसे	रु.	पैसे
मागील पानावरून			७,०५,५०४	२२
			७,०५५०४	२२

प्रमाणपत्र:–विदर्भ साहित्य संघ या संस्थेच्या ३१ मार्च १९६४ रोजी तयार असलेल्या स्थितिविवरणात वर दिलेले आकडे संघाच्या जमा खर्चाच्या पुस्तकाशी तंतोतंत जुळतात आणि ही पुस्तके आम्ही तपासली असून ती बरोबर आहेत असे आम्ही प्रमाणपत्र देतो.

महेश्वर जनार्दन गद्रे.
चार्टर्ड अकौंटंटस्
११–७–६४

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाची प्रकाशने

पुस्तके	रु. पैसे
*१ निबंध परिमल	२–२५
†२ सुमन संचय	१–२५
†३ मराठी गद्य	१–५०
†४ अंमलदार (नाटक) पु. ल. देशपांडे	२–७०
५ भारती (नाटक) नाना जोग	१–५०
६ हिंदी मराठी भाषा प्रवेशिका–मालतीबाई श्रीखंडे	१–२५
७ कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेखसंग्रह भाग २	३–००
८ The Vedasthana or The Ancient Home of the Indo–Aryans– (पूर्ण ग्रंथ) ले. कै डॉ तु. ज. केदार	३–००
✤ ९ आनंदगीत भाग ४ था –कवि श्री. आनंदराव टेकाडे	८–००
✠ १० प्रयोगक्षम मराठी नाटके –डॉ. मु. श्री. कानडे (सूचि ग्रंथ)	१५–००
११ पयोष्णी (कविता संग्रह) –कवि श्री. ज्ञा. रा. साधु	१–२५
१२ मराठी वर्णोच्चार विकास –डॉ. द. ह. अग्निहोत्री	१६–००
✠ कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध	
१३ वाग्वैजयंतीचे पुनर्मूल्यन –डॉ. मा. गो. देशमुख	०–३१
१४ नाटककार गडकरी श्री –द. रा. गोमकाळे	०–३१
१५ गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार–कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे	०–५०
१६ गडकऱ्यांच्या नाटकातील स्वगत–प्रा. श्री. मा. कुळकर्णी	०–५०
१७ सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल श्री.–द. वि. तेंडूलकर	०–५०
१८ गडकऱ्यांची खरी भूमिका –प्रा. भ. श्री. पंडित	०–५०
१९ गडकऱ्यांची नाटयशैली –प्रा. रू. पां. पांजणकर	०–५०
२० गडकऱ्यांची नाटयप्रकृति व नाटयसृष्टि–वसंत वरखेडकर	०–६०
मासिके	
२१ युगवाणी मासिक (वि. सा. संघाचे मुखपत्र) वार्षिक वर्गणी	५–००
२२ युगवाणी नाटयसंमेलन विशेषांक, डिसेंबर १९५८	३–००
२३ युगवाणी ४४ वे मराठी नाटयसंमेलन विशेषांक, एप्रिल १९६२	१–००

* ह्या पुस्तकाचे विक्रीचे अधिकार सुविचार प्रकाशन, नागपूर यांचेकडे आहेत.

† ह्या पुस्तकांच्या विक्रीचे अधिकार ठाकूर आणि कंपनी, नागपूर यांचेकडे आहेत.

✤ ह्या पुस्तकांच्या विक्रीचे अधिकार जयश्री प्रकाशन, धरमपेठ विस्तार, यांचेकडे आहेत.

✠ ह्या पुस्तकाच्या विक्रीचे अधिकार व्हीनस प्रकाशन पुणे यांचेकडे आहेत.

बाकीची सर्व पुस्तके वि. सा संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १ या पत्त्यावर मिळतील.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

नवीन सभासद होऊ इच्छिणारांस व प्रचारकांस सूचना

ज्यांना विदर्भ साहित्य संघाचे नवीन सभासद व्हावयाचे आहे त्यांच्या मार्गदर्शनासाठी पुढील सूचना देत आहोत.

१. सभासद होऊ इच्छिणाराने ठराविक अर्ज (आवेदनपत्र) भरून देणे आवश्यक आहे.

२. अर्जासोबत सभासदत्वाची वर्गणी पाठवावी. साधारण सभासदत्वाची वार्षिक वर्गणी रु. ३ आहे. मात्र वर्गणी दिल्याची छापील पावती अवश्य घ्यावी. सर्व अधिकृत प्रचारकांजवळ पावतीपुस्तके दिलेली आहेत.

३. केवळ सभासदत्वाचा अर्ज भरून सभासदत्व मिळणार नाही. तेव्हा वर्गणी भरल्याची पावती सभासदांनी जपून ठेवावी.

४. सभासदांना युगवाणी मासिकाचा अंक विनामूल्य पाठविण्यात येतो. ज्या महिन्यात वर्गणी भरली असेल त्याच्या पुढच्या महिन्यापासून युगवाणी अंक पाठविण्यात येतो.

५. अंक न मिळाल्यास सरचिटणीसांकडे चौकशी करावी. सोबत पावती-क्रमांक व प्रचारकाचे नाव कळवावे.

६. जुन्या सभासदांकडे मागील वर्गणी थकित असल्यास त्यांना मतदानाचा अधिकार राहणार नाही. ज्यांच्याकडे वर्गणी थकित राहून एक वर्ष किंवा अधिक काळ झाला असेल त्यांचे सभासदत्व रद्द करण्याचा र्यकारी मंडळास अधिकार आहे.

७. दि १५ ऑक्टोबर १९६४ पर्यंत जे सभासद नोंदलेले असतील व ज्यांच्याकडे कोणतीही वर्गणी थकित नसेल अशाच सभासदांना घटना १२ (आ) प्रमाणे आगामी निवडणुकीत मतदानाचा अधिकार राहील.

८. ज्या प्रचारकांकडे वि. सा. संघाच्या सभासदत्वाची पावती पुस्तके आहेत त्यांनी दि. १५ ऑक्टोबर १९६४ पर्यंत पावती पुस्तकांच्या मधल्या भागासह वर्गणी केंद्रीय कार्यालयात जमा करावी. तसेच नवीन सभासद होणाऱ्या व्यक्तीकडून सभासदत्वाचे आवेदनपत्र भरून घ्यावे.

वरील सूचनांचे पालन न झाल्यामुळे जर कोणाला सभासदत्व मिळू शकले नाही किंवा युगवाणीचा अंक मिळाला नाही किंवा आगामी निवडणुकीत मतदान करता आले नाही तर विदर्भ साहित्य संघावर त्याची कोणत्याही प्रकारे जबाबदारी राहणार नाही. वि. सा. संघाच्या कार्यकर्त्यांनीही ह्या सूचनांची दखल घ्यावी ही विनंती आहे.

नागपूर
दि. १५–९–६४

(प्रा) श्री. गो. काशीकर
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ, उत्तर अंबाझरी रस्ता
नागपूर

हे मासिक एम्. जी. सराफ यांनी नागपूर टाइम्स प्रेस, रामदासपेठ, नागपूर–१ येथे मुद्रित करून प्रा. श्री. मा. कुलकर्णी यांनी वि. सा. संघाकरिता, संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केले.

अनुक्रमणिका